
# अभंग जीवन



ॲड. रुपेश पवार

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

लेखसंग्रह

# अभंग जीवन

लेखक : ॲड. रुपेश पवार

# अभंग जीवन

## लेखक : ॲड. रुपेश पवार

पत्ता: ठाणे

मोबाईल : 9930852165

ई मेल : rupesh.b.pawar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

Whatsapp: 9987737237

esahity@gmail.com

प्रकाशन : २१ ऑक्टोबर २०२२ (धनत्रयोदशी १९४३)

©esahity Pratishthan®2022

ई साहित्य प्रतिष्ठान हे एक मुक्त विचार व्यासपीठ आहे. या पुस्तकात मांडलेले विचार हे त्या लेखकाचे असून सर्वच विचारांशी/ मतांशी/ संशोधनाशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कलामय ओळख




माझे मित्र साहित्यिक पत्रकार ॲड रुपेश बी पवार ठाण्यात गेल्या वीस वर्षापासून ते साहित्य, पत्रकारिता क्षेत्रात कार्य करतात. यांनी पाचशेहून अधिक ललित लेखांचे तसेच चारशेहून अधिक कवितांचे लेखन केले आहे. या लेखनातून आत्तापर्यंत रुपेशजींनी पाच पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यात दोन काव्यसंग्रह, एक ललित संग्रह, एक कथासंग्रह आणि एक संपादकीय लेखसंग्रह प्रकाशित केले आहेत. एक सामाजिक, कौटुंबिक नाटक रुपेश पवार यांनी लिहिले आहे. त्याचप्रमाणे ते गेल्या पाच वर्षांपासून चित्रपट कथा, गीतलेखन करत आहेत. या अष्टपैलू कार्यामुळे रुपेशजींना आतापर्यंत ३० हून अधिक पुरस्कार लाभले आहेत. झी २४ तासने या कार्याची दखल घेऊन रुपेश यांना मुलाखती करता निमंत्रित केले होते. ते अस्थिव्यंग या प्रकाराने अपंग आहेत. २०१३ पासून मी रुपेश यांना ओळखत आहे. ते विविध साहित्यिक कार्यक्रमांचे संयोजन करतात, अनेक कार्यक्रमात रुपेशजींचा सहभाग असतो.

त्यांची पुस्तके पुढील प्रमाणे नशा, अंतरंग काव्यसंग्रह, वलयांकित ललित संग्रह, मनोगाथा कथासंग्रह, प्रतिभावंतांच्या रंगसावल्या संपादन संग्रह आणि आता प्रकाशित झालेला चिंतनातील विचार, अशा सहा साहित्य कलाकृती रुपेश पवार यांच्या नावावर आहेत.


साहित्यिक, समाजसेवक


राजेंद्र मधुकर सावंत

+918693012316

# ॲडवोकेट रुपेश पवार यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके



# अर्पण गणराया

आरती गणराया
स्वामी सदगुरु राया
स्मरण तुझा भाव
तू आहे आत्म देव

वेदांचा लावी अर्थ
उमटले महा काव्य
कैसा कलाचा तू प्राण
ऐसा तू ग्रंथ राज

अभ्यासुनी प्रगटावे
ज्ञान ईश्वराचे देणे
सायास करत जावे
हाच अथर्वाचा यज्ञ

दिव्य हे तुझे रुप
सूर्या चंद्राहुनी तेज
बुद्धीत सर्व काळ
ऐसा आहे तू समर्थ

**ॲड. रुपेश पवार**

# प्रस्तावना :- चिंतनशील लेखक

माझे लाडके तरुण मित्र , विद्यमान एडव्होकेट , रूपेश पवार ठाणे यांनी त्यांच्या *अभंग जीवन* या पुस्तकासाठी..

" *आप्पा*

तुम्ही या माझ्या पुस्तकाला प्रस्तावना द्या अशी प्रेमळ विनंती केली.

एड.रूपेश हा तरुण जिज्ञासु असा कवी , लेखक , साहित्यिक आहे. सर्वांगी सतत लिहित असतो. तो महाकवि कालिदास प्रतिष्ठान पुरस्कार प्राप्त असून महाकवि कालिदास प्रतिष्ठान ठाणे या संस्थेचा देखील सेक्रेटरी आहे. त्याचे बरेच वांग्मय मी वाचले आहे.

या अगदी वेगळ्या अशा *अभंग जीवन* या समाज प्रबोधनात्मक पुस्तकाची निर्मिती म्हणजे एक सुंदर भावार्थी शाब्दकलाकृति आहे असे मी म्हणेन..!

***काव्य म्हणजे सुसंस्कृत विचार***

आणि *अभंग* म्हणजे कधीही न लोप पावणारा , न कधी दुभंगणारा असा सत्य सात्विक विचार आहे.

*अभंग* हा प्राचीन कालखंडापासुन प्रचलित असलेला वृत्तबद्ध , छन्दबद्ध असा प्रासादिक काव्यप्रकार आहे.

भारतभूमि ही देवांची , ऋषिमुनींची , तपस्वीन्ची , संतमहंतांची भूमी आहे.

***साहित्य हे वैश्विक आहे. ते वाङ्गमयीन सुसंस्कृत संस्कृतिचे वैभव आहे***

त्याला निश्चितच आध्यात्मिक वारसा आहे. आणि तो वारसा सर्वच साहित्यिक , कवींनी विचारवंतानी आपल्या लेखणीतुन जपला आहे. ही गोष्ट अत्यंत महत्वाची.

प्रस्तुत पुस्तकाचे लेखक एडव्होकेट रूपेश पवार यांना त्यांच्या मित्रांनी पारंपरिक लोकप्रिय ( सुश्राव्य ) अभंगांचा भावार्थ लिहावा असा आग्रह धरला ही खरच खुप आनंदाची गोष्ट!

कारण ही अशी *अभंग जीवन* पुस्तकाची निर्मिती झाली.

***भावार्थ लिहिणे म्हणजे एक लेखकाच्या चिंतनशीलतेला आव्हान असते***

13 व्या शतकापासुन अगदी 17 व्या शतकापर्यंत म्हणजे संत नामदेव , ज्ञानेश्वर यांच्या काळापासुन संत नीळोबा पर्यंत अनेक संतांनी उदंड प्रासादिक अभंग रचना केलेली आहे. तरी देखील जगतगुरु *संत तुकाराम* यांनी या *अभंग* काव्य प्रकाराला खुप उंचीवर नेलेले आहे. त्यांचे सर्व

अभंग म्हणजे जीवनाचे सुंदर सत्य महाम्य आहे.हे निर्विवाद.. की जिथे *ईश्वरीय अनुभूति* आहे.

पुढे अगदी केशवसुतांपासुन ते अनेक दिग्गज अशा कविंनी हा *अभंग काव्यप्रकार* लिहिला आहे. त्याबद्दल या प्रस्तावनेत मी विवेचन करणार नाही. किंवा लिहिणारही नाही. कारण त्याचा परामर्श लेखकाने घेतला आहे.

या पुस्तकात लेखकाने आपल्या अभ्यासपूर्ण आणि चिंतनशील लेखणीतुन प्रत्येक अभंग , ओवीचे अगदी सुलभ भाषेत विवेचन केले आहे ***हेच या पुस्तकाचे बलस्थान आहे असे मी म्हणेन**.*

संत ज्ञानेश्वर , संत एकनाथ , संत तुकाराम , संत जनाबाई , संत कान्होपात्रा , संत चोखामेळा , गदीमा , अशोक परांजपे , दत्ता पाटिल , वसंत बापट , सुधीर मोघे , प्रवीण दवणे अशा अनेक दिग्गज कवींच्या रचनांचा भावार्थ आपल्या प्रासादिक शब्दातुंन या पुस्तकातुन रसिक वाचकांच्या समोर ठेवला आहे. त्याचा आस्वाद , आणि त्यातील प्रसन्न भावनात्मक मकरंद वाचकांनी ग्रहण करावा एव्हढेच मी सांगेन...!!.

***सारांश*.....**

**" *देवा चरणी लीन व्हावे***

*मंगल करावे जीवन समाधानी*

*व्यथा असु दे , आनंद असु दे*

*प्रकाश वा तिमिर असु दे*

*वाट दिसु दे , अथवा न दिसु दे*

*गात मजसी पुढेच जाणे*

या स्व. मंगेश पाडगावकरांच्या रचनेने लेखक *एडव्होकेट रूपेश पवार*

याने *अभंग जीवन* या पुस्तकातील त्याच्या शब्दांना विराम दिला आहे.

त्याच्या पुढील लेखन प्रवासास माझ्या शुभेच्छा..!!!

*इती लेखन सीमा*...

*वि.ग.सातपुते (विगसा )*

*अध्यक्ष:- महाकवि कालिदास प्रतिष्ठान.*

*(पुणे , मुंबई , ठाणे , मराठवाड़ा)* *महाराष्ट्र*

* ( 9766544908)*



माझे मित्र साहित्यिक पत्रकार ॲड रुपेश बी पवार ठाण्यात  गेल्या वीस वर्षापासून ते साहित्य, पत्रकारिता क्षेत्रात कार्य  करतात. यांनी पाचशेहून अधिक ललित लेखांचे तसेच चारशेहून अधिक कवितांचे लेखन केले आहे. या लेखनातून आत्तापर्यंत रुपेशजींनी पाच पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यात दोन काव्यसंग्रह, एक ललित संग्रह, एक कथासंग्रह आणि एक संपादकीय लेखसंग्रह प्रकाशित केले आहेत. एक सामाजिक, कौटुंबिक नाटक रुपेश पवार यांनी लिहिले आहे. त्याचप्रमाणे ते गेल्या पाच वर्षांपासून चित्रपट कथा, गीतलेखन करत आहेत. या अष्टपैलू कार्यामुळे रुपेशजींना आतापर्यंत 30 पुरस्कार लाभले आहेत. झी 24 तासने या कार्याची दखल घेऊन रुपेश यांना मुलाखती करता निमंत्रित केले होते. ते अस्थिव्यंग या प्रकाराने अपंग आहेत. 2013, 14 पासून मी रुपेश यांना ओळखत आहे. ते विविध साहित्यिक कार्यक्रमांचे संयोजन करतात, अनेक कार्यक्रमात रुपेशजींचा सहभाग असतो. त्यांची पुस्तके पुढील प्रमाणे नशा, अंतरंग काव्यसंग्रह, वलयांकित ललित संग्रह, मनोगाथा कथासंग्रह, प्रतिभावंतांच्या रंगसावल्या संपादन संग्रह आणि आता प्रकाशित झालेला चिंतनातील विचार, अशा सहा साहित्य कलाकृती रुपेश पवार यांच्या नावावर आहेत.

राजेंद्र मधुकर सावंत
साहित्यिक, समाजसेवक

# भावार्थ मानवी मनाचा

नमस्कार मित्रांनो 'अभंग जीवन' या माझ्या आठव्या पुस्तकाचे प्रकाशन ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेब पेजवर पुन्हा एकदा होत आहे. त्यामुळे माझ्या मनात समाधानाची भावना आहे. हे पुस्तक अभंगाच्या भावार्थाचे आहे. ज्या गोष्टीचा मी कधी विचार केला नव्हता. ती गोष्ट माझ्या हातून सहज साध्य झाली. महाराष्ट्रातील संतांचे, कवींचे काही पारंपारिक लोकप्रिय अभंग भावार्थ स्वरूपात आणावेत अशी संकल्पना माझे टिटवाळ्यातील स्नेही अष्टपैलू कलाकार राजेंद्र मधुकर सावंत यांची होती. त्यांना अभंग विवेचन स्पर्धेत भाग घ्यायचा होता. त्याकरता त्यांनी मला सांगितले 'सुंदर ते ध्यान' या जगतगुरु तुकाराम महाराजांच्या अभंगावर आपण अर्थपूर्ण काही लिहू शकता का? असा प्रश्न त्यांनी केल्यावर, मी त्यांना लगेच हो म्हणालो आणि दोनच दिवसात 'सुंदर ते ध्यान' या अभंगाचे अर्थपूर्ण लेखन केले. तो अभंग व्हिडिओ स्वरूपात सावंत यांनी माझ्याकडे पाठवला. त्यावेळी ते म्हणाले आपण असे भावार्थ व्हिडिओ स्वरूपात लोकांच्या समोर आणू या. मग मी या कामाला लागलो.

मी एका एका अभंगाचे भावार्थ लेखन करत होतो परंतु राजेंद्र सावंत यांना वेळे अभावी प्रत्येक अभंगाचे भावार्थ व्हिडिओ स्वरूपात आणता आले नाहीत. तोपर्यंत माझ्याकडे दहा भावार्थ लिहून पूर्ण झाले होते. त्यामुळे मी त्या सर्व भावार्थ लेखांना दैनिक ठाणे वैभवकडे दिले आणि ते प्रसिद्ध झाले. ठाणेकर

वाचकांना ते आवडले, सर्वांच्या अतिशय सुंदर प्रतिक्रिया मला मिळू लागल्या. या भावार्थ लेखनाच्या खाली माझ्या नावापुढे राजेंद्र सावंत यांच्या सूचनेनुसार मी संतवाणी अभ्यासक असे विशेषण लावले. हा राजेंद्र सावंत यांचा मोठेपणा होता, त्यासाठी मी त्यांना धन्यवाद देतो. त्यांच्या मुखातून 'टिटवाळयातील महागणपतीने' मला अभंग भावार्थ लेखनाची आज्ञा केली असावी. असे मी मानतो.

मित्रांनो बालवयापासून मला मोतीबिंदूचा दृष्टीदोष होता. त्यामुळे वयाच्या वीस वर्षापर्यंत मी लिहू, वाचू शकत नव्हतो. त्यामुळे पुस्तकांचे वाचन स्वतः माझ्याकडून कधी झाले नाही पण बाबा महाराज सातारकर यांची कीर्तन ऐकत माझे बालपण गेले. त्याचवेळी ज्योतिषभास्कर जयंत साळगावकर, ठाण्यातील खगोल अभ्यासक - पंचांग करते साहित्यिक दा कृ सोमण आणि जीवनविद्या मिशनचे शिल्पकार सद्गुरु श्री वामनराव पै यांची प्रवचने मुलाखती मी ऐकत होतो. त्यातून जाणिवेत कुठेतरी संतवाणी अभ्यासाचा विचार कायम माझ्या मनात घोळत असायचा. तरीपण मी त्याकडे फारसे लक्ष दिलेले नव्हते. कालांतराने माझ्या डोळयांची शस्त्रक्रिया झाल्यावर मी कविता लेखनाकडे वळालो. त्यानंतर मी ललित लेख लिहायला सुरुवात केली. हळूहळू हे लिखाण करत असताना, माझ्याकडून हिंदू सण उत्सव या विषयावरील काही लेख लिहिले गेले. गणेशोत्सवा निमित्त श्री गणेश लेखही लिहित गेलो. २०१६ साली माझे मित्र साहित्यिक विनोद पितळे यांच्या आग्रहामुळे सारथी या विशेषांकात

मी एक अध्यात्मिक लेख लिहिला. पुढे याच विषयावर मी आणखी काही लेख लिहिले परंतु तरीही त्यावेळी माझ्या मनात असा विचार आला नाही की आपण अभंगांवर भावार्थ लेखन करू शकतो आणि त्याचे कार्यक्रम होऊ शकतात. म्हणून असे वाटते. राजेंद्र सावंत हे गणरायाचे दूत या नात्याने माझ्याकडे आले आणि त्यांनी मला दिशा दाखवली.

अभंगांचा भावार्थ लिहिणे ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नाही. ती अवघडातील अवघड गोष्ट आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात संत साहित्याचा अभ्यास करावा लागतो पण तो अभ्यास कळत नकळत माझ्याकडून झाला. याचे कारण मी नेहमी साहित्यात रमतो, साहित्याच्या सागरी लाटांचा मी आनंद घेतो. तो आनंद केवळ माझ्यासाठी नसतो. लोकांना नवीन विचार, नवीन संकल्पना आपल्याला देता येईल का? याचा विचार माझ्या अंतरंगात कायम होत असतो. हल्ली प्रत्येक टीव्ही चॅनलवर कीर्तनाच्या मालिका सुरू आहेत. त्यातून समाज जीवनात वैचारिक बदल होत आहेत. अध्यात्म म्हणजे कर्मकांड या दुर्दैवी विचाराला गाडून टाकण्याचे कार्य या मालिका करीत आहेत. तरीपण या मालिकांमध्ये एका अभंगाचा विचार करताना, कीर्तनकार खूप काही गोष्टी सांगून जातात. त्यावेळी

कीर्तन करता करता नकळत मूळ विषय बाजूला राहतो. मला नेहमी असे वाटते कीर्तनात अभंग हा मध्यवर्ती भूमिकेत असतो. त्यात सह भूमिका अभंगाच्या भावार्थची असते पण तसे होताना दिसत नाही. यात कीर्तनकारांचा

फारसा दोष नाही. कारण समाजाला जागृत करताना काही जास्तीच्या गोष्टी सांगाव्या लागतात. आपले कीर्तन फुलवावे लागते. त्यामुळे अशा गोष्टी होत असतात.

या सर्वांचा विचार करून साहित्यिक या नात्याने

मी अभंगाचे भावार्थ लेखन केले. त्यामध्ये प्रामुख्याने कवितांचा आणि ललित लेखांचा मी परिणामकारक विचार केला आहे. कविता लिहिताना विषय किती मोठा असला, तरी तो मोजक्या शब्दात मांडवा लागतो. आणि ललित लेखात विषय कितीही मोठ्या प्रमाणात आपण लिहू शकलो, तरी वर्तमानपत्राच्या दृष्टीने कमीत कमी शब्दात लेख लिहावे लागतात. अशाप्रकारे दोन साहित्य प्रकारांचा विचार करून मी हे भावार्थ लिहिले आहेत. अभंगाच्या प्रत्येक ओळीचा अर्थ

साध्या, सोप्या शब्दात सांगता येतो. मग त्यासाठी उगाच पांडित्यदर्शन करण्याची गरज मला वाटत नाही. जीवनाला जे उपयुक्त आहे. ते सांगण्याचा प्रयत्न मी केला आहे. अभंग हे केवळ देव देव करणारे शब्द भ्रम नाहीत. त्या प्रत्येक शब्दाचा मानवी जीवनाशी खूप खोल असा संबंध आहे. असे मला मनोमन वाटते. आपल्या समाजात अध्यात्माच्या नावाखाली अनेक चुकीच्या गोष्टी कायम होत असतात. त्याकरिता साहित्यिक, कीर्तनकार आणि लोककलाकार यांनी जबाबदारी घेऊन. खरे अध्यात्म जे आहे ते लोकांपर्यंत

शुद्ध भावनेने पोहोचवायला हवे. त्याच विचारातून मी हा यशस्वी प्रयत्न केला आहे। म्हणून मला आज समाधान वाटते आहे.

या मनोगताच्या शेवटी मी साईभक्त श्री राजेंद्र सावंत, ई साहित्य प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा प्रकाशक सुनिळ सामंत (नाम काका) आणि दैनिक ठाणे वैभवचे आभार मानतो. या तिघांनी माझ्या ह्या नवीन संकल्पनेचे आपापल्या परीने स्वागत केले. त्यातून मला त्यांनी संतवाणी अभ्यासक केले पण संतवाणी अभ्यासक असे म्हणून घेण्याची माझी पात्रता नसताना. त्यांनी मला ही पदवी दिली. म्हणून मी या तिघांचा शतशः ऋणी आहे. आपण सर्व वाचकांनी हे 'अभंग भावार्थ लेख' जरूर वाचावेत आणि मला आपल्या मनात येणारे थेट अभिप्राय व्हाट्सअप वर पाठवावे. कारण पुढे, मागे मी या भावार्थाचे निरूपण करणार आहे. त्यासाठी आपल्या प्रतिक्रिया महत्त्वाच्या आहेत.

राम कृष्ण हरी, जय जय रघुवीर समर्थ

**ॲड. रुपेश पवार**

**संतवाणी अभ्यासक**

**९९३०८५२१६५.**

# अभंग जीवन: अनुक्रमणिका


1. मागतो मी विठ्ठला
2. गिरिजाचा पुत्र गणपती
3. देवाचा आत्मशोध
4. रंगलो गुरु भजनी
5. माऊलींचा सार हरिपाठ
6. एकनाथी अभंगाचा रंग
7. अवघा विठ्ठलभाव
8. तुका म्हणे आता
9. भक्तांना सोहळा
10. एक आस जननी विठाबाई
11. पाहता रूप विठ्ठलु
12. तुझ्यात देव आहे
13. खरे साधु संत कसे असावे
14. एक प्रभावी भक्ती
15. देव भक्तीची भूक
16. पुतळा चैतन्याचा
17. सुखमय भक्तीची पायवाट
18. सांगाती माझा
19. तुझे नाम घेता, नको वेदगीता
20. जीवनाचे गाणे कसे गावे

# ** मागतो मी विठ्ठला **

॥१॥

## कवी दत्ता पाटील.



# मागतो मी पांडुरंगा

मागतो मी पांडुरंगा फक्त एक दान,
मिळे ज्याने मुक्ती ऐसे द्यावे मज ज्ञान
मिळे ज्याने मुक्ती ऐसे द्यावे मज ज्ञान ।।१।।

बालपणी होते माझे मन हे अजाण
तरुणपणी संसारात गेले सर्व ध्यान
वृद्धपण येता आली जागती महान,
मिळे ज्याने मुक्ती ऐसे द्यावे मज ज्ञान ।।२।।

पतितांना पावन करते दया तुझी थोर,
भीक मागतो मी चरणी,
अपराधी घोर अपराधी घोर
क्षमा करी बा विठ्ठला अंगी नाही त्राण
मिळे ज्याने मुक्ती ऐसे द्यावे मज ज्ञान ।।३।।
****

## "मागतो मी पांडुरंग" या गाण्याचा भावार्थी संवाद...
## या गाण्याचे गीतकार आहेत कवी दत्ता पाटील.

प्रत्येक माणूस संसाराच्या भवसागरात अडकतो. त्याला भगवंताची गोडी असूनही तो भगवंतापर्यंत पोचत नाही. अशावेळी तो भगवंताकडे मागणं मागतो. या संसारापासून मला जरा मुक्ती मिळेल असं ज्ञान बा विठ्ठला तू दे.

कारण मी तुझ्यापासून नेहमी दूर राहिलो.


बालपणी मी अजाण होतो. म्हणून तुझा सहवास मला कळला नाही. तरुणपणात माझ चित्त संसाराच्या रहाटगाडग्यात गुंतून पडल. पण आता म्हातारपण येताच मला जागृती आली. म्हणून मला मुक्ती मिळेल असं ज्ञान पांडुरंगा तू दे.

तुझी दया झाली तर साधारण याचकही पावन होतो. म्हणून तुझ्या चरणी मी भिक्षा मागतो. माझ मन हे अपराधी आहे. त्याकरता हे करुणाकरा मला क्षमा कर. माझ्या अंगी तुला प्राप्त करण्याची कोणतीही जान नाही.

म्हणून या संसाराच्या भवसागरातून मला जरा मुक्ती मिळेल असं ज्ञान, हे श्रीरंगा तू दे.

# ** गिरिजाचा पुत्र गणपती **

॥२॥




**कवी वसंत बापट**

# गणनायका शुभदायका

गणनायका, शुभदायका
यावे तुम्ही गिरीकंदरा
सह्याद्रीच्या हृदयामध्ये,
लेण्याद्रीच्या या मंदिरा ॥१॥

शिवनेरीच्या शिवशंभूचा
सहवास पावन लाभला
सुकडीतीरी तव मंदिरी
हो पुण्यसंचय हा भला
गिरीजात्मजा तव मूर्ती
ही सिंदूरचर्चित सुंदरा ॥२॥

तोडूनिया भवपाश हे
भवकाळ त्या गुंफातुनी
तपी बैसले, बहु कष्टले
का व्यर्थ ते योगीमुनी
भक्ती तुझी सुखदायिनी,
तप का उगा मग आचरा॥३॥
***

# 'गणनायका शुभदायका' या गाण्याचा भावार्थी संवाद. या गाण्याचे गीतकार आहेत कविवर्य वसंत बापट

हे अभंग गीत कविवर्य वसंत बापट यांनी लिहिलं आहे. या गीतात अष्टविनायकातील श्री शेत्र लेण्याद्रीचा भक्तिमय महिमा वर्णिला आहे. त्याचा भावार्थ आपण पाहूया.

गिरिजेचा आत्मज म्हणजे पार्वतीचा पुत्र, या अर्थाने लेण्याद्री तीर्थस्थानाला गिरिजात्मज किंवा गिरिजात्मक अस म्हणतात. इथे पार्वतीने तपश्चर्या करून गणपतीला प्रसन्न करून घेतल होतं तेव्हा श्री गजानन भाद्रपद शुद्ध चतुर्थीला बटुरूपात प्रकट झाले. पार्वती तपश्चर्या करताना म्हणाली. "गणनायका, शुभदायका
यावे तुम्ही गिरीकंदरा"
म्हणून कवी पुढे म्हणतात. हा श्री गणेश कुठे आलाय तर सह्याद्रीच्या हृदयामध्ये लेण्याद्री मंदिरात. असं यथार्थ वर्णन या कवींनी केल आहे.

पुढच्या रचनेत वसंत बापट म्हणतात. या लेण्याद्री पर्वताला शिवनेरीच्या शिवाजी महाराजांचा सहवास लाभला आहे. कारण स्वराज्य व्हावे ही तर श्रींची इच्छा असं शिवराय कायम म्हणायचे. अशा या लेण्याद्रीच्या सानिध्यात कुकडी नदी वाहते. अपभ्रंशानं तिच नाव सुकडी असेही आहे. त्यामुळे या लेण्याद्री स्थानी पुण्यसंचय झाला आहे. या ठिकाणी सिंदूरचर्चित सुंदर अशी गिरिजात्मज मंगलमूर्ती आहे. असा हा महिमा गणेश भक्तांना कविवर्यांनी सांगितला आहे.

शेवटच्या चरणामध्ये बापट असं सांगतात. अहो या गणेशाचे नाव घेतले की आपले सारे भवपाश सुटून जातात. भवकाळाच्या गुंत्यातून आपण बाजूला येतो. इथे

साक्षात योगीमुनींनी कष्ट सोसून तपे केली आहेत. या सर्वातून हे शेत्र अती पावन झालेल आहे. आता आपण फक्त निर्विकारपणे त्या गजाननाची भक्ती करावी. मग तो गजानन प्रसन्न होईल. असं या गीतात सांगितलं आहे.

या गीताचा भावार्थ मी माझ्या काव्य प्रेरणेतून मांडलेला आहे. गणेश भक्तांनाचा जो भक्तिभाव आहे. तो या भावार्थातून सांगितला आहे. कवी वसंत बापट हे महाराष्ट्राचे प्रतिभावान साहित्यिक होते. त्यांच्या काव्याचा हा आस्वाद आहे. बोला मंगलमूर्ती मोरया, गणपती बाप्पा मोरया.

# ** देवाचा आत्मशोध **

।।३।।

## जगद्गुरु तुकाराम महाराज





# देह देवाचे मंदिर

देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर ॥१॥

जशी उसात हो साखर, तसा देहात हो ईश्वर ।
जसे दुग्धामध्ये लोणी, तसा देही चक्रपाणी ॥२॥

देव देहात देहात, का हो जाता देवळात ।
तुका सांगे मूढ जना, देही देव का पहाना ॥३॥
***

# 'देह देवाचे मंदिर' या गाण्याचा भावार्थी संवाद. या गाण्याचे अभंगकार आहेत जगद्गुरु तुकाराम महाराज

या अभंगात जगद्गुरु तुकाराम महाराज सांगतात.

अरे माझ्या वैष्णव भक्त बांधवांनो देव फक्त देवळात नाही. तो आपल्या देहात विराजमान आहे. आपल्या देहाच्या अंतरंगात जो आत्मा आहे तोच ईश्वर आहे. म्हणजे जाणीव रूपाने भगवंत आपल्या मनात आहे.

हे भगवंताच निवासस्थान कुणाला आपल्या अंतरंगात हव असेल, तर त्यान आपल आत्मन निर्मळ, शुद्ध कराव करण ईश्वरीची गोड साखर याच देहाच्या उसात आहे. तुकाराम महाराज या अभंगात पुढे म्हणतात. ज्याप्रमाण दुधात लोण्याचा अंश असतो. त्यावर यथायोग्य प्रक्रिया केल्यावर सायासान धह्यातून लोणी मिळत. अगदी तसच या देह, मनातील ईश्वराच आहे. त्यामुळे काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यासारखे जे सर्व आत्मरंगी विकार आहेत ते आपण बाजूला केले पाहिजेत. तेव्हाच आपल्याला भगवंताची प्राप्ती होईल. "असा हा देवाचा महिमा आहे.

म्हणून भक्त मंडळींनो देव देहात शोधा. का तुम्ही तो देव देवळात शोधता? या प्रकारे जे देव शोधतात ते लोक खऱ्या अर्थान अज्ञानी आहेत. असं तुकाराम महाराज आपल्या काव्य वाणीतून भक्तगणांना सांगत आले आहेत. म्हणून देहाच्या ठिकाणी देवाला पाहणं गरजेच आहे. हे देह मंदिर त्यानच बांधल आहे. म्हणून म्हणाव.

"देह देवाचे मंदिर,

आत आत्मा परमेश्वर हो"

# ** रंगलो गुरु भजनी **

॥४॥



## कवी प्रवीण दवणे

# निघालो घेऊन

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा
निघालो घेऊन दत्ताची पालखी
आम्ही भाग्यवान आनंद निधान
झुलते हळूच दत्ताची पालखी
रत्नांची आरास साज मखमली
त्यावर सुगंधी फुले गोड ओली
झुळूक कोवळी चंदनासारखी
सातजन्मांची ही लाभली पुण्याई
म्हणून जाहलो पालखीचे भोई
शांत माया मूर्ती पहाटेसारखी
वाट वळणाची जिवाला या ओढी
दिसते समोर नरसोबाची वाडी
डोळियांत गंगा जाहली बोलकी

***

## 'निघालो घेऊन' या गाण्याचा भावार्थी संवाद.
## या गाण्याचे गीतकार आहेत कविवर्य प्रवीण दवणे

श्री दत्तगुरूंचे भक्तगण संपूर्ण भारतात आहेत. त्यामुळे आपल्या हिंदूधर्मात दर गुरुवारी दत्तगुरूंच यथासांग पूजन केल जात. आपण ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिदेवांची गुरु म्हणून, सद्गुरू म्हणून पूजा करतो. हे ब्रह्मा, विष्णू, महेश आपल्याला दत्तगुरूंच्या तीन मुख कमलात दिसतात. अशी समस्त भक्तांची श्रद्धा आहे. म्हणून आपण सर्वजण दत्तगुरूंना पुजतो, दत्तगुरूंच्या तीर्थक्षेत्री जात असतो.

"निघालो घेऊन" या गीतामध्ये कविवर्य प्रवीण दवणे यांनी, अशाच एका तीर्थस्थानाचा उल्लेख केलेला आहे. या गीतात दत्तगुरुंचा भक्त म्हणतोय. आज श्री गुरु मी तुमची पालखी घेऊन जात आहे. म्हणजे मी खरोखर भाग्यवान आहे. मला तुम्ही हे परम भाग्य दिल आहे. खांद्यावर घेतलेली ही पालखी हळूच झुलते तेव्हा जणू तुमचा आशीर्वाद मला मिळतो.

अशा या पालखीत रत्नांची आरास केली आहे. त्या पालखीत तुमच्या पादुकांवर लाल, शेंदरी रंगाची ताजी टवटवीत फुलं वाहीली आहेत. त्यावर जणू अत्तर शिमपडलेल आहे. वाऱ्याची मंजुळ झुळूक आली की ती चंदनाच्या मंद सुगंधापरी भासते.

माझ्या सात जन्माची ही एक पुण्याई आहे. म्हणून आपली पालखी आज मी खांद्यावर घेतली आहे. श्री गुरु आपली ही मूर्ती मला प्रातक वेळेच्या रविकिरणांसारखी वाटते आहे. अस हे तुमचं तेजस्वी रूप आहे ते नयनात किती बर साठवाव. अस माझं होऊन गेल आहे. म्हणून म्हणतात, माणसाजवळ पुण्याई असेल तर देवाच दर्शन घडत.

आता कित्येक तास मी आपल्या भजनात तल्लीन होऊन चालतो आहे. आता ती वळणाची वाट मला दिसते आहे. बघता बघता आपली नरसोबाची वाडी

आली आहे. अशाप्रकारे आज माझी अंतरीची इच्छा पूर्ण झाली आहे. म्हणून माझे डोळे भरून आले आहेत. त्यामुळे माझे जीवन गंगेत स्नान केल्याप्रमाणे शुद्ध झाले आहे.

"शुद्ध मनाच्या शुद्धतेणे
मी अर्पितो भाव हे माझे"

असे या भक्ताचे होऊन गेले आहे. म्हणजे

"वाट वळणाची जिवाला या ओढी
दिसते समोर नरसोबाची वाडी
डोळियांत गंगा जाहली बोलकी"

# ** माऊलींचा सार हरिपाठ **

## ।।५।।

### ज्ञानेश्वर माऊली






# देवाचिये द्वारी

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी।
तेणे मुक्ती चारी साधियेल्या।।१।।

हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा।
पुण्याची गणना कोण करी।।२।।

असोनी संसारी जिव्हे वेगू करी।
वेद शास्त्र उभारी बाह्य सदा।।३।।

ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे।
द्वारकेचे राणे पांडवा घरी।।४।।
***

# 'देवाचिये द्वारी' या गाण्याचा भावार्थी संवाद. या गाण्याचे अभंगकार आहेत ज्ञानेश्वर माऊली

ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून सांगतात. माझ्या श्रोत्यांनो, भगवंताच्या खऱ्या भक्तांनो. आपण कोणत्याही प्रकारचे यज्ञयाग करू नका, उगाच कर्मकांडाला बळी पडू नका. देवाच्या दारात फक्त उभ राहून क्षणभर एक हरी नाम घ्या. त्यातून चार मुक्तीच्या अध्यात्मिक मार्गाचे, समाधान तुम्हाला लाभेल. त्याकरता अधिक सायास करायची जरुरी नाही.

"एक हरी आत्मा
प्रत्येक जीवात वसला
त्याचेच स्मरण करा"

हे हरी नाम मनापासून, आत्म्याच्या देठापासून भक्तगणांनी घेतले, तर त्यातून गणती करता येणार नाही इतके पुण्य आपणास प्राप्त होईल. म्हणून "हरी मुखे म्हणा
हरी मुखे म्हणा
पुण्याची गणना कोण करी"

या हरी नामाकरता देवा पुढे तासन तास बसण्याची गरज नाही. संसाराची, प्रपंचाची कर्तव्य पार करता करता सहज आपल्याला देवाच्या सानिध्यात जाता येईल. आपल्या अंतरंगातील परमशक्तीचे दार उघडता येईल. वेद शास्त्रातही देवानी, ऋषिमुनींनी हेच सांगितले आहे. म्हणूनं ज्ञानराजांनी वेदांताचा अर्थ, लोकभाषेत आणला होता. तो हरिपाठातून, सोपा केला होता.

ज्ञानराज माऊली या वेदांताविषयी अस म्हणतात. खुद्द महर्षी व्यासांनीही महाभारत या काव्यग्रंथात सर्वांना सांगितले आहे, उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे. निखळ, निरपेक्ष भावनेन श्रीकृष्णाच नाव पांडवांनी घेतल होत. त्यांनी श्रीकृष्णाला मनातून पुजल होत. म्हणून ऐन वक्ताला हा द्वारकाधीश, केशवराज पांडवांच्या घरी उतरला. मग काय झाल हे आपल्याला ठाऊक आहे. धर्माच पालकत्व साक्षात श्रीकृष्णाने उचलून धरल आणि बघता बघता धर्म विजयी पांडव झाले. असा महिमा ज्ञानेश्वरांनी वर्णन करून सांगितला आहे.

# ** एकनाथी अभंगाचा रंग **

॥६॥



संत एकनाथ महाराज.

# माझे माहेर पंढरी

माझे माहेर पंढरी, आहे भीवरेच्या तीरी
माझे माहेर पंढरी, आहे भीवरेच्या तीरी ॥१॥

बाप आणि आई, माझी विठठल रखुमाई
माझे माहेर पंढरी ॥२॥

पुंडलीक राहे बंधू, त्याची ख्याती काय सांगू
माझे माहेर पंढरी ॥३॥

माझी बहीण चंद्रभागा, करीतसे पापभंगा
माझे माहेर पंढरी ॥४॥

एका जनार्दनी शरण, करी माहेरची आठवण
माझे माहेर पंढरी ॥५॥

***

## 'माझे माहेर पंढरी' या गाण्याचा भावार्थी संवाद.. या गाण्याचे अभंगकार आहेत संत एकनाथ महाराज.

महाराष्ट्रातील भागवत संप्रदाय म्हणजे विठ्ठल भक्तांच माहेरघर ते पंढरपुरात आहे. अस म्हणताना संत श्रेष्ठ एकनाथ महाराज म्हणतात. विठ्ठल ज्या ठिकाणी निवासस्थानी आहे. त्या ठिकाणी पंढरपुरात आमचे माहेरघर आहे आणि ते पवित्र अशा भीमा नदीच्या काठी विराजमान आहे.

अशा या चैतन्यदायी पंढरी नगरीत जो परमात्मा युगे आठ्ठावीस निरंतर उभा आहे. तो आम्हा भक्तांचा नुसता देव नाही, तर आमचा माय बाप आहे. म्हणजे विठ्ठल बाबा, रखुमाई आई यातून निर्मिली आहे ती आत्मरंगी विठाई. अस हे साकार झालेल दैवत आहे.

विठ्ठलाला माय बाप का म्हटल जात? हे पण आपल्याला या अभंगातून समजून घेता येतं. भक्त पुंडलीक हा आई बाबांची सेवा करत असताना. साक्षात पांडुरंग प्रगट होतात. पुंडलीक त्यावेळी

देवाकरता वेळ काढत नाही. उलट वीट पुढे करून देवाला तो उभच ठेवतो. अशा वेळी जणू या पांडूरंगाला हा भक्त पुंडलीक श्रीगणेश वाटत असवा मंडळी. म्हणून पांडुरंग विटेवरी उभा राहिला आणि त्यान तेच नाव धारण केल. म्हणून विठ्ठलाच स्मरण करताना आजही भक्त पुंडलीकाची आठवण काढली जाते.

याचप्रमाणे आमची बहिण चंद्रभागा आहे. ती आम्हा भक्तांना पापापासून दूर ठेवते, म्हणजे पापमुक्त करते. आई नंतर आपल्या संस्कृतीच पवित्र नात बहिण हे

आहे. आईच उरलेल जीवन अमृत तिच्या जवळ असतं. म्हणून भागवंताचे भक्त अर्धचंद्राकार चंद्रभागेला बहिणीची उपमा देतात.

'ना इथे लिंगाचा भेद
ना जाती, धर्माचा विटाळ
पांडुरंग, विठ्ठल भाव,
ना इथे दुभंग'

मित्रांनो पंढरीच माहेरपण असं आहे. म्हणून संत एकनाथ म्हणतात जेव्हा या माहेरपणाची आठवण येते तेव्हा मी विठू माऊलीला भेटतो आणि शरण जाऊन लोटांगण घालतो.

भीमेकठी पवित्र झाले
आमचे तनमन हो
पांडुरंगी रंगले हो
आमचे आत्मरंग हो

म्हणून माणसाने एकदा तरी या माहेर घरी जावे आणि अनुभवाने म्हणावे.
माझे माहेर पंढरी,
आहे भीवरेच्या तीरी...

# ** अवघा विठ्ठलभाव ** ।

।७।।

## कवी अशोकजी परांजपे





# अवघे गर्जे पंढरपूर

अवघे गर्जे पंढरपूर
चालला नामाचा गजर ।।१।।
टाळघोष कानी येती
ध्यानी विठ्ठलाची मूर्ती
पांडुरंगी नाहले हो
चंद्रभागा तीर ।।२।।
इडापिडा टळुनि जाती
देहाला या लाभे मुक्ती
नामरंगी रंगले हो
संतांचे माहेर ।।३।।
देव दिसे ठाई ठाई
भक्त लीन भक्तापाई
सुखालागी आला या हो
आनंदाचा पूर ।।४।।

***

## 'अवघे गर्जे पंढरपूर' या गाण्याचा भावार्थी संवाद...
## या गाण्याचे गीतकार आहेत कवी अशोकजी परांजपे.

एखादी विवाहित मुलगी किंवा परदेशस्थ मुलगा आपल्या आई-वडिलांच्या ओढीणे घरी येतो. घरी आल्यावर ते दोघेही आनंदी होतात.

त्याचप्रमाणे प्रत्येक वारकरी आषाढी, कार्तिकी एकादशीला पंढरपुरात जातो तेव्हा त्याला आपल्या माहेरी आल्यासारखे वाटते.

विठ्ठलाचे प्रत्यक्ष दर्शन घडू दे अथवा न घडू दे तरी वारकरी आनंदित होतात आणि ते परमानंदाच्या डोही डुंबतात.


कारण त्यांच्या मनात, ध्यानात, बुद्धीच्या कणाकणात विठ्ठल हा नामरूपी दाटलेला असतो. आनंदला त्यावेळी भरते येते. मग त्या वाळवंटातही चैतन्य दूमदूमते.

म्हणून म्हणतात "अवघे गर्जे पंढरपूर चालला नामाचा गजर".

# ** तुका म्हणे आता **

॥८॥






## जगातगुरु तुकाराम महाराज.

# सुंदर ते ध्यान

सुंदर ते ध्यान, उभे विठेवरी
कर कटावरी ठेवोनिया ॥१॥
तुळसी हार गळा, कांसे पितांबर
आवडे निरंतर तेची रुप ॥२॥
मकर कुंडले तळपती श्रवणी
कंठी कौस्तुभमणी विराजीत ॥३॥
तुका म्हणे माझे हेची सर्व सुख
पाहीन श्रीमुख आवडीने ॥४॥
***

## 'सुंदर ते ध्यान' या गाण्याचा भावार्थी संवाद.. या गाण्याचे अभंगकार आहेत तुकाराम महाराज.

विठ्ठलाचं हे सुंदर ध्यानस्थ रूप पाहून. आपलं मन मंत्रमुग्ध होतं. आपल्याला त्यातून आत्मानंद मिळतो. मस्तकापासून पायापर्यंत ही मूर्ती तेजाने परिपूर्ण अशी आहे. या मनोभावन मूर्तीने कटेवर दोन हात ठेवले आहेत.

अशा या अलौकिक, स्वयंभू, सक्षम विठुरायाच्या गळयात. तुळशीच्या सुगंधीत, आकर्षक, हिरव्यागार माळा आहेत. विठ्ठलाचे सौंदर्य पितांबर नेसलल्याने सजलेले आहे. त्यामुळे या मूर्तीकडे पाहताच आपण थक्क होऊन जातो.


अशा या भगवान, परमात्म्याच्या कानात डुलणारी कुंडले आहेत आणि ती वाऱ्याच्या झुळकीने हलून आपल मन वेधून टाकत आहेत. त्याच वेळी गळयातील कंठाजवळ देवाजीचा कौस्तुभमणी असून तो शोभेवंत दिसत आहे.

म्हणून तुकाराम महाराज आपल्या विठ्ठलाचे वर्णन करताना म्हणतात. माझ्या जीवनाचे सर्व सुख पांडुरंगाच्या चरणापाशी व्याकूळले आहे. अस हे पावन श्रीमुख मी आवडीने बघतो. त्यात तल्लीन होऊन, समरस होतो. हे माझ्या प्रेरणेच निवासस्थान आहे.

हे संत तुकारामांनी किती समर्पक शब्दात लिहिले आहे. विठ्ठलाच्या मूर्तीकडे बघताना आपल्याला हाच अनुभव येतो.

# ** भक्तांना सोहळा **

॥१॥



# विठू माझा लेकुरवाळा

विठू माझा लेकुरवाळा
संगे गोपाळांचा मेळा ||१||

निवृत्ती हा खांद्यावरी
सोपानाचा हात धरी
पुढे चाले ज्ञानेश्वर
मागे मुक्ताई सुंदर ||२||

गोरा कुंभार मांडीवरी
चोखा जीवा बरोबरी
संत बंका कडेवरी
नामा करांगुळी धरी ||३||

जनी म्हणे गोपाळा
करी भक्तांचा सोहळा ||४||
***

# 'विठू माझा लेकुरवाळा' या गाण्याचा भावार्थी संवाद. या गाण्याचे अभंगकार आहे संत जनाबाई

भगवंताचे भक्त भगवंताला मोठं करतात.
कारण कोणत्याही देवाला भक्तांच्या भक्तीची भूक असते. त्यामुळेच भक्तांना देवाची ओढ लागते.
म्हणून संत जनाबाई या अभंगात सांगतात.
ही पंढरी जणू आमच्यासाठी गोकुळनगरी आहे.
या गोकुळात गोपाळांचा मेळा आहे.
एखाद्या माऊलीला लहान मुलं प्रिय असतात. तिला आपण लेकुरवाळी म्हणतो. अगदी याचप्रमाणे जनाईला तो पांडुरंग लेकुरवाळा वाटतो. 'संत येती घरा तोचि दिवाळी दसरा' असं काहीस जनाईच्या मनाच झालं आहे.

या विठू माऊलीचे बाळगोपाळ कोण आहेत, तर निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि सगळ्यात धाकटी मुक्ताई. म्हणजे ज्ञानेश्वर माऊलींना ज्यांनी सद्गुरु म्हणून शिकवण दिली. ते निवृत्तीनाथ. जे भक्तांच्या आधाराचे प्रतीक बनले ते सोपानदेव आणि या तीन भावंडांना जीने प्रेमाची सावली दिली, ती मुक्ताई होय. या चौघांच्या प्रयत्नांमुळे वारकरी संप्रदायावर मोठे संस्कार झाले. त्यांना जनाईने आद्य स्थान दिले आहे.

जनाईने त्यानंतर नित्याचं कर्म करता करता. पांडुरंगी रंगून जाणारे संत गोरा कुंभार यांना स्थान दिले आहे. पांडुरंगाच्या हृदय स्थानी चोखामेळा यांना ठेवले आहे. शूद्र असूनही हालअपेष्टा सहन करून, चोखोबांनी देवाच्या पायरीला पावन केले. संत बंका यांनाही जनाईने पावन केले आहे. सर्वात शेवटी तिने आपले गुरुदेव नामदेव महाराजांना स्थान दिले आहे.


हे सर्व संतगोपाळ एकत्रित येऊन, भावभक्तीचा सोहळा कसा घडवून आणतात. हा सगळा सारांश जनाबाईंच्या अभंगातून, किती सहज साकारला गेला आहे.

"विठ्ठलाचे पायी
आम्ही झालो भाग्यवान
पांडुरंग माऊली
असे आमुची सुंदर"
असा हा भाव इथे व्यक्त झाला आहे.

अध्यात्माच्या भाषेत म्हणतात, मन जेव्हा विषयातून निवृत्त होतं तेव्हा आपल्याला ब्रह्मज्ञान प्राप्त होतं. मग उन्नतीचा सोपान वर चढत जातो. त्यावेळी आपल्याला मुक्ती मिळते. म्हणून आपल्या नित्य कार्यातून निरपेक्ष मनाने भगवंताचे स्मरण आपण करावे. यातूनच भगवंताचे सानिध्य आपणास मिळते. पांडुरंग हरी वासुदेव हरी.

# ** एक आस जननी विठाबाई **

॥१०॥



संत कान्होपात्रा.

# नको देवराया

नको देवराया, अंत आता पाहूं
प्राण हा सर्वथा, जाऊं पाहे ।।१।।
हरिणीचें पाडस, व्याघ्रें धरियेलें
मजलागी जाहलें तैसे देवा ।।२।।
तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनी
धांवे हो जननी विठाबाई ।।३।।
मोकलूनी आस, जाहले उदास
घेई कान्होपात्रेस हृदयात ।।४।।
***

# 'नको देवराया' या गाण्याचा भावार्थी संवाद.
# या गाण्याचे अभंगकार आहे संत कान्होपात्रा.

या अभंगात संत कान्होपात्रानी भक्त आणि भगवंत यांच उत्कट नातं दर्शवलं आहे. अभंगाच्या पहिल्या चरणात 'नको देवराया, अंत आता पाहूं' असं म्हणत. कान्होपात्रानी त्या परमईश्वराला आर्त स्वरात हाक दिली आहे. कारण संकटरुपी भयाने तिचा प्राण सर्वथा जाऊ पाहात हेता. म्हणजे भीतीने तिचा जीव मेटाकुटीला आला होता. माणूस जेव्हा संकटात असतो तेव्हा तो देवाचा असाच धावा करतो. विचार करुनही जेव्हा मार्ग सापडत नाही. त्यावेळी माणसाचा जीव कासावीस होतो. प्राण कंठाशी आल्यासरखा वाटतो. ही भावना संकटाच्या काळात माणसाच्या मनात कायम येते.

कान्होपात्रा म्हणते, हे संकट कशासारखे आहे? तर ते पुढील रचनेप्रमाणे आहे. त्यात कान्होपात्रा म्हणते,

हरिणीचें पाडस, व्याघ्रें धरियेलें
मजलागी जाहलें तैसे देवा '

म्हणजे ज्याप्रमाणे हरणाच्या मागे वाघ लागल्यावर हरिण जिवाच्या आकांताने पळते. अगदी तसेच संकटाच्या वेळी माणसाचे होते. ही उपमा किती सुंदर, समर्पक आहे. त्यामुळे भीतीची, काळजीची सखोलता आपल्याला कळून येते.

मग संत कान्होपात्रा देवाकडे प्रार्थना करते आणि म्हणते. 'तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनी' याचा अर्थ असा तुझ्याविना मला कुणी वाचवणार नाही. तू अंतरयामी आहेस, या ब्रह्मांडाच्या त्रिभुवनाचा तू स्वमी आहेस. म्हणून तूच 'धावे हो जननी विठाबाई' अशाच प्रकारे कुठलाही सामान्य माणूस देवाची प्रार्थना करतो. तोच भव इथे प्रगट झाला आहे.

येवढी प्रार्थना करुनही देव धावून येत नाही. त्यामुळे कान्होपात्रा अतिव्याकुळ होऊन देवाला शेवटची हाक मारुन विनवणी करते.

' मोकलूनी आस, जाहले उदास
घेई कान्होपात्रेस हृदयात '

या ओळीमधून कान्होपात्रा आर्ततेने संगते. देवा तुझ्या न येण्याने मी उदास झाली आहे. माझ्या डोळ्यासमोर अंधार पसरला आहे. आता हे संकट मला गिळनकृत करेल. काहीही कर पण या दुष्टचक्रातून माझी सुटका कर ही एकच आस माझी आहे. (मोकलूनी म्हणजे सोडने, सुटका करने) नाहीतर तुझ्या हृदयात मला सामावून घे. ही अशी आणीबाणीची परिस्थिती प्रत्येक सामान्य माणसावर येत असते तेव्हा तो माणूस देवाजवळ कान्होपात्रासारखीच विनवणी करतो आणि देव त्यांना सुखा समाधानाचा राज्य मार्ग दाखतो. ही एक समर्पणाची भावना आहे. ती समस्त भाक्तांमध्ये असते.

पण कान्होपात्राची जीवनगाथा सामान्य माणसापेक्षा वेगळी होती. कान्होपात्राही वेश्येची मुलगी होती पण तिला पांडुरंग माऊलीचा ध्यास लागला होता. तिच्या अंतरंगात निर्मळ भक्तीचा झरा वाहत होता. तिने शीलभंग करणारं वेश्यापण नाकालं होतं. त्या विरुद्ध कान्होपात्राने एकाकी संघर्ष केला पण एके दिवशी तिचा नालाज झाला. बादशहाचे दास कान्होपात्राला घेऊन जायला आले. त्यावेळी कान्होपात्राच्या शब्दातून हा अभंग आला, असे म्हटले जाते. या अभंगातील शेवटचे चरन बोलून तिने पाडुरंगाच्या चरणी आत्मत्याग केला आणि संत म्हणून कान्होपात्रा पावन झाली. म्हणून माणसाने पापमुक्त राहून भगवंताची निर्मळ मनाने भक्ती केली, तर तो माणूस संत होतो.

# ** पाहता रूप विठ्ठलु **

॥११॥

## संत ज्ञानेश्वर



# रूप पाहता लोचनी

रूप पाहता लोचनी
सुख जाले वो साजणी
तो हा विठ्ठल बरवा
तो हा माधव बरवा ।

*बहुत सुकृतांची जोडी*
म्हणुनी विठ्ठल आवडी
सर्व सुखाचे आगरु
बापरखुमादेवीवरु ॥

***

## 'रूप पाहता लोचनी' या गाण्याचा भावार्थी संवाद... या गाण्याचे अभंगकार आहेत संत ज्ञानेश्वर

आळंदीतून निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताई ही जिवाभावाची चार भावंडे प्रथमतः पंढरपूरात गेली. त्यावेळी त्यांनी त्या विठोबा माऊलीचे पहिल्यांदा दर्शन घेतले. हे दर्शन घेताना ज्ञानेश्वरांना वेगळी अनुभूती आली. या विठुरायाचे वर्णन करताना. संत ज्ञानेश्वर बहिण मुक्ताईला म्हणाले. मला ही मूर्ती पाहून एक प्रश्न पडला आहे. मी या मूर्तीचे वर्णन कोणत्या शब्दात करू अशी भावना आज माझी झाली आहे! असे ज्ञानेश्वरांनी या ठिकाणी म्हंटले होते ते पुण्यक्षेत्र म्हणजे पंढरीचे विठ्ठल मंदिर होय. या अभंगात ज्ञानेश्वर सांगत आहेत.

मुक्ते मी या विठूरायाची मूर्ती मन भरून पाहतो आहे. मला कळत नाही आता या मूर्तीचे वर्णन मी काय करू आणि ते कसे करू अगं प्रिय बहिण मुक्ता आज मी निरुत्तर झालो आहे. माझ्या मनातील हा काव्यभाव तू समजून घे. ही विठ्ठलाची मूर्ती, ही माधवाची मूर्ती खूप सुंदर, अप्रतिम आहे. म्हणून या समोरील मूर्तीला शब्दात पकडता येत नाही. हाच श्रीरंगाचा महिमा आहे.

अगं मुक्ता जीवनात हे असे दर्शन घडायला सुकृतांची जोड असावी लागते. म्हणजे 'पूर्व जन्माची संचित पुण्याई असावी लागते'. त्याकरता नीती, धर्माने भगवंताची साधना करावी लागते. शुद्ध अंतःकरणाने आयुष्याची वाटचाल धरावी लागते. मग विठ्ठलाची, भगवंताची गोडी अंतरंगाला लागते. देव दर्शन हे सहज घडत नाही. मूर्ती बघून तीर्थप्रसाद घेतला म्हणजे देवदर्शन झाले, असे होत नाही. जीवनाच्या सर्व सुखाचे निवासस्थान भगवंत झाले की ते आई बाप वाटतात. म्हणून या कडव्यात आले आहे.

'बहुत सुकृतांची जोडी
म्हणुनी विठ्ठल आवडी
सर्व सुखाचे आगरु
बापरखुमादेवीवरु'

मित्रांनो हा अभंग आपल्याला सांगतो आहे. आपल्या मनात भगवंताविषयी खरी श्रद्धा असेल, तर भगवंताचे रूप सुखदायी वाटते. विठ्ठल, कृष्ण अथवा कुठलेही दैवत आसो ते आपल्याला सुंदर वाटणार आहे. असा भक्तीमय भाव मनात तयार होण्यासाठी पूर्व जन्मीचच नाही, तर याही जन्मी नीती, धर्माने वागून ईश्वराची साधना करावी लागते.

शुद्ध मनाने जीवनाची वाटचाल करावी लागते तेव्हाच आपल्याला खऱ्या अर्थाने सुखी होता येते. त्यालाच संत म्हणतात..."सर्व सुखाचे सागर मायबाप भगवंत" अशा पद्धतीने आपण जीवन जगत गेलो, तर आपल्या जीवनाचे सार्थक होइल.

या अभंगात बरवा हा शब्द सुंदरतेच्या अर्थातून आला आहे. आगरु हा शब्द निवासस्थान म्हणून आला आहे. सुकृतांची जोडी म्हणजे पूर्व संचिताची जोड असा आहे तर साजणी हा शब्द लाडाने वापरला आहे. तो लहान बहिण मुक्ताईकरता आहे.

# ** तुझ्यात देव आहे **



॥१२॥

कवी सुधीर मोघे

# "मंदिरात अंतरात'

मंदिरात अंतरात
तोच नांदत आहे
नाना देही नाना रूपी तुझा देव आहे
तोच मंगलाची मूर्ती
तोच विठ्ठलाची कीर्ती
तोच श्याम तोच राम दत्तधाम आहे
संतांचिया कीर्तनात
साधकांच्या चिंतनात
तोच ध्यास तोच आस तोच श्वास आहे
तोच बाल्य तारुण्यही
वार्धक्याचा विश्रामही
तोच ऐल तोच पैल आदि-अंत आहे

***

## 'मंदिरात अंतरात' या गाण्याचा भावार्थी संवाद
## या भक्तीगीताचे गीतकार आहेत कवी सुधीर मोघे

मला असे वाटते सुधीर मोघे यांच्या या गीतात गूढ अर्थ दडलेला आहे. हे गीत मी अनेकदा ऐकले आहे. अतिशय सुंदर भक्तीगीत गीतकार सुधीर मोघे यांनी रचले आहे. सुधीर फडके यांनी त्यास सुश्राव्य संगीतबद्ध केले आहे.

या गीताच्या पहिल्या कडव्यात गीतकार म्हणतात.

मंदिराच्या गाभाऱ्यात तो एकच देव नांदत आहे. जो विविध रुपे घेऊन आपल्या सोबत असतो. म्हणजे देवाला आपण विविध नावाने स्मरत असलो, तरी भगवंत एकच आहे. या कडव्याचा दुसरा अर्थ आपल्याला सांगतो. मंदिराच्या गाभाऱ्यात तोच नांदतो आहे. जो नाना देही नाना रुपी आहे. म्हणजे देव शोधायला कुठे जाऊ नका, प्रत्येक माणसात देव आहे, तोच तुझ्यातही आहे, माझ्यातही आहे. अशाप्रकारे दू अर्थी या गीताचे पहिले कडवे आहे, असे मला मनोमन वाटते. या कडव्याचा दुसरा अर्थ लक्षात घेऊन, आपण जर या गीताचा विचार केला, तर या गीताचा अर्थ आपल्याला अंतर्मुख करून जातो.

गीतकार आपल्या दुसऱ्या कडव्यात म्हणतात.

आपणच मंगलाची मूर्ती आहोत, तीच विठ्ठल नामाची कीर्ती आहे, तोच अधर्माचा विनाश घडवणारा द्वारकेचा राजा कृष्ण आहे. भारताला अमानवी प्रवृत्तीतून मुक्त करून, या देशात सद्भावनेचे राज्य आणणारा तोच आयोध्येचा राम आहे. तेच आपले दत्तगुरु निवास आहे.

तिसऱ्या कडव्यात देव नेमका कुठे आहे. हे गीतकाराने यथार्थ शब्दात सांगितले आहे. देव हा संतांच्या कीर्तनात आहे. म्हणून माणसाने जीवनात संतांची संगत धरावी, मनोभावे सदगुरू करावा. करण देव साधारणपणे साधकांच्या चिंतनातही असतो. मग तो माणसाचा एकमेव ध्यास होतो. अशाप्रकारे देवाची आस

माणसाला लागून राहते. त्यावेळी देव माणसाच्या प्रत्येक श्वासात निरंतर वाहतो, राहतो. असा भाव या कडव्यात प्रगट होतो.

शेवच्या चौथ्या कडव्यात सुधीर मोघे स्पष्ट करतात. देव हेच आपले अज्ञानी, निर्मळ बालपण आहे. देव हेच आपले ऊर्जा स्रोत तारुण्य आहे. तोच आपला उतारवयातला भगवंती विश्राम आहे. असा देव आपल्या जीवनात सर्वत्र भरला आहे. तोच मानवी जीवाला ऐल तीरावरून पैल तीराकडे घेऊन जातो. म्हणजे आपल्या जगण्याची सुरुवात तो करतो आणि शेवटच्या धामी तोच आपल्याला घेऊन जातो. याचा अर्थ परमेश्वरच आपला आदि आणि अंत आहे. अशाप्रकारे हे गीत आपल्याला जीवनाचे अध्यात्म समजावून देते. याच करता हे गीत मला भावते. म्हणून हा भावार्थ इथे शब्दबद्ध केला आहे. आपल्यालाही तो आवडेल असे मला वाटते.

# ** खरे साधु संत कसे असावे **

॥१३॥



जगतगुरु तुकाराम महाराज.

# 'जें का रंजलें गांजले'

जें का रंजलें गांजले।
त्यासि ह्मणे जो आपुलें ॥१॥
तोचि साधु ओळखावा।
देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥
मृदु सबाह्य नवनीत।
तैसें सज्जनांचें चित्त ॥३॥
ज्यासि अपंगिता नाही।
त्यासि धरी जो हृदयीं ॥४॥
दया करणें जें पुत्रासी।
तेचि दासा आणि दासी ॥५॥
तुका ह्मणे सांगू किती।
तोचि भगवंताच्या मूर्ति ॥६॥
***

# 'जें का रंजलें गांजले' या अभंगाचा भावार्थी संवाद
# या अभंगाचे अभंगकार आहेत जगतगुरु तुकाराम महाराज.

साधू संतांनी कसे असावे, कसे नसावे. याचा वस्तूपाठ तुकाराम महाराजांनी आपल्यासमोर ठेवला आहे. गरीबी, दारिद्र्य आळस आणि प्रामाणिकपणाचा अभाव यामुळे काही लोक साधू पुरुषांचा मुखवटा धारण करुन दारोदार जातात. धर्माचा विचार सांगून सामान्य जणांना भ्रमित करतात. त्यातून ते आपल्या पोटाची भुक भागवतात. असे साधू पुरुष धर्मसेवेचा आव आणतात. म्हणजे तुकारामांच्याच वाणीत सांगायचे झाले, तर 'कलियुगी घरोघरी संत झाले फार, वितभर पोटासाठी फिरतात दारोदार' अशी यांची गत. अशा परिस्थितीत मग साधू, संत कोणास म्हणावे? ह्या विचाराचा अभंग रचताना तुकाराम महाराज भक्तांशी संवाद साधतात, त्यांना समजावून देतात. तो अभंग आज आपण नव्याने उलगडणार आहोत.

या अभंगाच्या पहिल्या चरणात तुकाराम महाराज म्हणतात. जें का रंजलें गांजले, त्यासि ह्मणे जो आपुलें. तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा. म्हणजे जे लोक दुःखी, कष्टी दारिद्र्याने गांजलेले आहेत. अशा लोकांना जो व्यक्ती आपले मानतो. त्यांच्या सुखासाठी आपणहून प्रयत्न करतो. तोच साधु किंवा संत असतो. अशा संत पुरुषाला अथवा स्त्रीला सर्वांनी देवपण बहाल करावे. कारण जो व्यक्ती आपल्याला चांगला मार्ग दाखवतो, तोच खरा देव असतो.

आसा देव आपण जाणल्यावर त्याचा स्वभाव कसा असावा. हेही तुकारामांनी दुसऱ्या चरणात सांगितले आहे. हे सांगताना ते लिहितात,

मृदु सबाह्य नवनीत,
तैसें सज्जनांचें चित्त.
ज्यासि अपंगिता नाही,
त्यासि धरी जो हृदयीं.

याचा अर्थ जो स्वभावाने मृदु बोलणारा आहे. अंतर्बाह्य लोण्यासारखा तलम, मऊ आहे. असा हा सज्जन जाणिवेने सहहृदयी असतो. असे हे सज्जन व्यक्तिमत्व वंचित अनाथांना संभाळते, त्यांना आपल्या अंतरंगात सामावून घेते. तो माणूस खरा देव आहे, साधु, संत आहे.

अशा या साधु संतांची लक्षणे काय असतात हे सुद्धा जगतगुरुंनी सांगून ठेवले आहे. म्हणून शेवटच्या तिसऱ्या चरणात जगतगुरु लिहून जातात. पालक ज्याप्रमाणे आपल्या मुलाबाळांवर प्रेम करतात, माया लावतात. त्याप्रमाणे आपल्या दास दासीवर पालकरुपी प्रेम, मायेचा वर्षाव साधु, संत करतात. या उदाहरणातील माणसे आपल्या अवतीभवती असतील, तर त्यांना जीते, जागते भगवंत म्हणावे. त्या मानवी मूर्तीला आपण नमन करावे, असे जगातगुरु तुकाराम महाराज या अभंगात सांगतात. म्हणून

दया करणें जें पुत्रासी,
तेचि दासा आणि दासी.
तुका ह्मणे सांगू किती,
तोचि भगवंताच्या मूर्ति.

या अभंगातील विचारातून सामान्य माणसाने संत पुरुष शोधायला हवेत. जाणीवांचे डोळे बंद करून दिसेल त्याला साधु, संत समजू नये. जीवन ही एक परीक्षा आहे. त्यामुळे आपण संतत्वाची परीक्षा घेतली पाहिजे. मग त्यावर सर्वस्व वाहिले पाहिजे.

हल्लीच्या काळात संत म्हणून घेणारे महापराक्रमी, विचित्र धर्म सेवक आहेत. त्यांनी समाजाला स्वतःच्या पोटासाठी जखडून ठेवले आहे. ते त्यांना फसवतात, ढोंगीपणाने लबाडी करतात, धन, दौलत पळवतात. त्यामुळे सामान्य माणसाला


चांगल्या घरातून झोपडीत राहावे लागते. याचे कारण एकच बुवा, बाबा, भगत, फकीर आणि त्यांचे गंडे, दोरे दुपारे, भस्म यात सदन माणसाची राखरांगोळी होते. म्हणून आधुनिक साधुसंतांचा आढावा आपण घेतला पाहिजे. हेच जगतगुरु तुकाराम महाराज आपल्याला सांगतात.

यात सबाह्य हा शब्द अंतर्बाह्य या अर्थाने आला आहे, तर नवनीत शब्द लोणी या हेतूने आला आहे.

अपंगिता या शब्दामागे आश्रयदाता, सांभाळणारा हा अर्थ आहे. त्रासलेले पीडलेले याला तुकाराम यांनी रंजलें गांजले म्हंटले आहे.

# ** एक प्रभावी भक्ती **

।।१४।।




संत चोखामेळा...

# 'अबीर गुलाल'

अबीर गुलाल उधळीत रंग।
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग॥ धृ ॥

उंबरठ्यासी कैसे शिवू आम्ही जातिहीन|
रूप तुझे कैसे पाहू त्यात आम्ही लीन|
पायरीशी होऊ दंग गावूनी अभंग॥ १ ॥

वाळवंटी गावू आम्ही वाळवंटी नाचू|
चंद्रभागेच्या पाण्याने अंग अंग न्हाऊ।
विठ्ठलाचे नाम घेऊ होउनी निःसंग ॥ २॥

आषाढी-कार्तिकी भक्तजन येती।
पंढरीच्या वाळवंटी संत गोळा होती।
चोखा म्हणे नाम घेता भक्त होती दंग॥ ३॥

***

## 'अबीर गुलाल' या अभंगाचा भावार्थी संवाद
## या अभंगाचे अभंगकार आहेत संत चोखामेळा...

चोखामेळा यांनी आपल्या जातीची अवहेलना झेलून, समाजाची पर्वा न कराता, स्वत:ला हट्टाने भगवंत विठ्ठलाचे परमभक्त मानले. यामुळे ते संत म्हणून नवा रूपाला आले. त्यांनी आपल्या धर्मातील जातीयतेला मोडून काढण्याचा चंग मनाशी बांधला. त्याच विचारातून हा अभंग साकारला 'अबीर गुलाल उधळीत रंग', 'नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग'. या अभंगाला आज आपण जाणून घेणार आहोत.

चोखामेळा या अभंगाच्या सुरुवातीच्या दोन ओळीत म्हणत आहेत. मी जातीने शूद्र असलो, तरी माझी विठ्ठलभक्ती पावन आहे. म्हणून मी देव भक्तीचा अबीर, गुलाल उधळत आहे. त्या रंगात मी पूर्णपणे रंगून गेलो आहे. माझ्या अंतरंगात सखा पांडुरंग फेर धरून नाचत आहे. यात नाथ म्हणजे अंतरात्मा, कारण प्रत्येक जीवात एक अंतरात्मा असतो. त्या अंतरात्म्यात भगवंताचा वास असावा. असे आध्यात्मात सांगितले जाते. म्हणून नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग. असा हा मनोभाव चोखामेळांनी यातून व्यक्त केला आहे.

पुढच्या पहिल्या कडव्यात चोखामेळा म्हणतात. मंदिराच्या उंबरठ्याला शिवण्याची पात्रता समाजाने मला दिली नाही. कारण मी आणि आमचे जाती बांधव जातिहीन आहोत. म्हणजे आमची जात पूर्वीपासून हीन मानली गेली आहे. म्हणून पांडुरंगा आम्ही उंबऱ्याबाहेर बसून तुझ्या रुपाकडे नुसते पाहत नाही, तर आम्ही तुझ्या चरणाशी लीन होतो. कारण आम्ही या देवळाच्या पायरीवर देहभान विसरून तुझे अभंग गातो आणि दंग होतो. आम्हाला मंदिराची नाही, तर त्या पांडुरंग भक्तीची ओढ आहे. असे चोखोबांनी इथे दर्शविले आहे.

चोखोबा आपल्या अभंगाच्या दुसऱ्या कडव्यात म्हणून जातात. आम्हाला देवळात जाण्यासाठी उच्चवर्णीयांनी मज्जाव केला, तरी आम्ही त्याचे दुःख मानून घेणार नाही. आम्ही भगवंताच्या भूमीवर पंढरीच्या वाळवंटात नाचू, गाऊ, चंद्रभागेच्या पाण्यात आम्ही न्हाऊ. चंद्रभागेचे ते भगवती जलतीर्थ सर्वांगी लावू तेव्हा आमचे शूद्रपण निघून जाईल. हेटाळणी करणाऱ्या समाजाकडून आम्हाला कोणतीही अपेक्षा नाही. आम्ही समाजाचे दास नाही, तर भगवंताचे दास आहोत. या भावनेतून आमचे जाती बांधव श्री हरी विठ्ठलाचे नाम अंतरंगातून घेतील. त्यातून आत्मा परमात्म्याचे सत्संग मिलन घडवतील. हा प्रवाही विचार संत चोखांनी तुमच्या आमच्या समोर ठेवला आहे.

तिसऱ्या आणि शेवटच्या कडव्यात चोखोबांनी आषाढी, कार्तिकी एकादशी अभंगातून दाखवली आहे. अशा या आषाढी, कार्तिकी एकादशीला सर्व जातीचे, पंथाचे संत सज्जन पंढरपूराच्या वाळवंटात एकत्र गोळा होतात. त्यावेळी भगवंत रुपाची यात्रा भरते. या पंढरी यात्रेमध्ये मी आणि माझे जाती बांधव हरीचे नाम घेत. 'संत, भक्तांच्या वैकुंठी मेळाव्यात' दंग होऊन जातो. कारण देव दगड मातीत पूजा, ध्यानासाठी आहे, पण शेवटी खरा देव चराचरात आहे. म्हणजे तो पंढरपूरच्या प्रत्येक संत सज्जनात आहे. त्यामुळे आमची भक्ती नित्य पावन आहे. त्यात उच्चवर्णीयांचे कोणतेही बंधन नाही. असा वैचारिक वार करणारा परखड विचार संत चोखोबांनी इथे मांडून ठेवला आहे.

एक लेखक, संतसाहित्य अभ्यासक म्हणून हा विचार मी आपल्यासमोर आणाला आहे. या काव्यभावनेचे चिंतन आपण सर्वांनी जरुर करावे. त्यातून उरली सुरली जातीयता गाडून टाकावी आणि आपण खऱ्या अर्थाने भगवंताच्या चरणाशी लीन व्हावे.

# ** देव भक्तीची भूक **

॥१५॥



आषाढी दिंडी

# 'भेटी लागी जीवा'

भेटी लागी जीवा लागलीसे आस ।
पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥१॥
पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन ।
तैसे माझे मन वाट पाहे ॥२॥
दिवाळीच्या मुळा लेकीं आसावली।
पाहतसे वाटुली पंढरीची ॥३॥
भुकेविला बाळ अति शोक करी।
वाट पाहे उरि माउलीची ॥४॥
तुका ह्मणे मज लागलीसे भूक ।
धावूनि श्रीमुख दांवी देवा ॥५॥

***

## 'भेटी लागी जीवा' या अभंगाचा भावार्थी संवाद
## या अभंगाचे अभंगकार आहेत संत तुकाराम महाराज...

जगतगुरु तुकाराम महाराजांनी या अभंगात माणसाच्या स्वभाविक गुणधर्मातून परमेश्वर भक्तीची ओढ कशी असते. हे आपल्या सर्वांना दाखवून देताना, काही उदाहरणांचा सुंदर वापर केला आहे. कोणत्याही माणसाला आपली एखादी प्रिय व्यक्ती भेटायला येणार असेल किंवा आपली एखादी प्रिय वस्तू मिळणार असेल, तर त्या माणसाचे मन आनंदाने उचंबळून येते. म्हणजे त्याच्या मनाला ओढ लागून राहते. अशा प्रकारची एक ओढ गणेश चतुर्थीच्या काळात गणेश भक्तांना लागलेली असते. म्हणून आध्यात्मात रुची असणाऱ्या प्रत्येक माणसाला हा अभंग फार आवडतो. आज आपण याच लोकप्रिय अभंगाचा भावार्थ जाणून घेणार आहोत.

या अभंगाच्या पहिल्या दोन ओळीत तुकोबा म्हणतात रात्रंदिन देवा मी तुझ्या नावाचा जप करतो आहे. तुझ्याकडे येण्याची वाट मी बघतो आहे. देवा तुझ्या भेटीची आस मला सर्वार्थाने लागली आहे. त्यामुळे जीव माझा व्याकुळला आहे. म्हणून 'भेटी लागी जीवा लागलीसे आस' हा भाव इथे व्यक्त झाला आहे.

पुढे सुरुवातीच्या अंतऱ्यात उदाहरण देताना, जगातगुरु म्हणतायत. पूर्णिमेचा चंद्र पाहून चकोर पक्षी ज्याप्रमाणे जीवन जगतो. तैसे माझे मन तुझी वाट पाहत आहे. जसे दिवाळीच्या मुहूर्तावर (मुळा) प्रत्येक माहेरवाशिणीला (पूर्वीच्या काळी) आई-वडिलांच्या निमंत्रणाची ओढ लागायची. म्हणून तिचे माहेरच्या वाटेकडे लक्ष लागून रहाचे. तसे माझे मन पंढरीकडे लागले आहे. असा मनोभव सहज संत तुकारामांच्या लेखणीतून शब्द धनात आला आहे.

पुढेच्या शेवटच्या अंतऱ्यात संत शिरोमणी तुकाराम म्हणत आहेत. भुकेलेले बाळ आईचा अमृत पान्हा मिळण्यासाठी अति शोक करु लागते म्हणजे रडू लागते.

मग माउलीचा स्पर्श झाल्यावर ते बाळ शांत, निवांत होते. त्याचप्रमाणे तुकाराम महाराज म्हणतात. तुझ्या दर्शनाची भूक मला लागली आहे. म्हणून हे पांडुरंगा भगवंता तू त्वरेने धावून ये आणि मला तुझे श्रीमुख दाव म्हणजे मी समाधानी होईल. तुझ्या त्या भेटीसाठी मी वैकुंठनगरीत येईन. तू फक्त आज्ञा कर.


याचा अर्थ तुकारामांना प्रेममय भक्तीची ओढ लागली आहे. म्हणूनच वारकरी संप्रदायात भेटी लागी जीवा... या अभंगाची चाल वेगाने गायली जाते. कारण कोणत्याही ओढीमध्ये मनाचा वेग सर्वात जास्त असतो. त्यामुळे वारी मधल्या पारंपारिक भजनात भेटी लागी जीवा, लागलीसे आस. हे भजन कायम गायले जाते. अशाप्रकारे तुकोबांनी भक्तीचा मार्ग सरळ सोपा करून दिला आहे.

-- विशेष माहिती --

मित्रांनो या अभंगात चकोर या पक्षाचा उल्लेख झाला आहे. चकोर हा चंद्राच्या प्रकाशात काजव्यांना खातो. म्हणून कवी कल्पनेत हा पक्षी चंद्र प्रकाशावर जगतो असे म्हंटले आहे. गुगलवर या पक्षाची माहिती आपला मिळते, ती आपण जरूर वाचावी.

# ** पुतळा चैतन्याचा **

॥१६॥



कविवर्य गदिमा...

# 'कानडा राजा पंढरीचा'

कानडा राजा पंढरीचा
वेदांनाही नाही कळला अंत पार याचा ।
कानडा राजा पंढरीचा ।।दु।।

निराकार तो निर्गुण ईश्वर ।
कसा प्रकटला असा विटेवर ।।
उभय ठेविले हात कटिवर ।
पुतळा चैतन्याचा ।। १ ।।

परब्रह्म हे भक्तांसाठी ।
मुके ठाकले भीमेकाठी ।।
उभा राहिला भाव सावयव ।
जणू की पुंडलिकाचा ।। २ ।।

हा नाम्याची खीर चाखतो ।
चोखोबांची गुरे राखतो ।।
पुरंदराचा हा परमात्मा ।
वाली दामाजीचा ।। ३।।
***

## 'कानडा राजा पंढरीचा' या अभंगाचा भावार्थी संवाद या अभंगाचे गीतकार आहेत कविवर्य गदिमा...

मित्रांनो विठ्ठल हे महाराष्ट्राचे आणि कर्नाटक राज्याचे आराध्य दैवत आहे. पंढरपूरच्या जवळ उत्तर कर्नाटकाची सीमा लागते. त्यामुळे विठ्ठल या देवतेला पांडुरंग, श्रीहरी जसे बोलले जाते. त्याप्रमाणे या विठ्ठलाला 'कानडा राजा' असेही म्हटले जाते. म्हणून माय मराठीचे एकोणिसाव्या शतकातील महाकवी गदिमांनी 'कानडा राजा पंढरीचा' हे अभंग गीत लिहून ठेवले आहे. आज हे गीत लहानांपासून थोरा मोठ्यांपर्यंत फार लोकप्रिय आहे. गेल्या तीन पिढ्यांना या अभंग गीताने संस्कारित केले आहे. म्हणजे भगवंत भक्तीची समर्पित भगवी पताका प्रत्येकाच्या अंतरंगात या अभंगाने रुजवून ठेवली आहे. म्हणून हा अभंग मी आज भावार्थासाठी घेतला आहे.

अभंग सुरू होत असताना महाकवी गदिमांनी लिहिले आहे. 'वेदांनाही नाही कळला अंत पार याचा'. म्हणजे विठ्ठल हे परब्रम्ह स्वरूप आहे. त्याचा अंत, त्याची व्याप्ती किती आहे. हे कुणाला अजून कळले नाही. अध्यात्मिक संत, पंडित, कवी, गीतकार या देवतेच्या बाबतीत अजूनही संभ्रमित आहेत. म्हणून हा 'कानडा राजा' वेदांनाही कळलेला नाही. कारण असे म्हणतात विठ्ठल हे श्रीकृष्णाचे दुसरे रूप आहे. साक्षात कृष्ण भगवंत विठ्ठल रूपात अवतरले, असे वारकरी संप्रदायात कायम म्हटले जाते. त्यामुळे वेदांतालाही या देवतेचा अंतपार कळलेला नाही.

यानंतरच्या पहिल्या कडव्यात ग. दि. माडगूळकर आपल्याला सांगतात. हा पांडुरंग मूर्ती रुपात आपल्यासमोर असला, तरी तो भक्तांच्या आंतरिक दृष्टीने

'निराकार निर्गुण ईश्वर' आहे. त्यामुळे या भगवंताचे आपल्या भक्तांकडे परिपूर्ण लक्ष आहे. त्याची दृष्टी कायम भक्तांवर स्थिर असते. असा हा पांडुरंग विटेवर भक्तांसाठी युगांयुगे उभा आहे. कमरेवर दोन्ही हात ठेवून तो वैष्णवांची वाट बघतो आहे. म्हणून ही निराकार निर्गुण ईश्वरी मूर्ती सर्वांना तेजस्वी वाटते. त्यामुळे तो एक चैतन्याचा पुतळा आहे, असा आभास या विठ्ठलाकडे पाहिल्यावर होतो. हा सार्वत्रिक भाव गदिमांनी आपल्यापुढे सादर केला आहे.

दुसऱ्या कडव्यात गदिमा सांगून जातात. विठ्ठल हे दैवत भक्तांसाठी परब्रह्मस्वरूप आहे. म्हणून ते ऊन, वारा, पावसात भीमेकाठी मुके ठाकले आहे. याचा अर्थ हा विठ्ठल काही बोलला नाही, तरी तो सर्व काही जाणतो. भक्तांच्या जीवनातील पीडा घालवून तो त्यांना मुक्त करतो. म्हणून मनातल्या भावनेने तो सावयव उभा राहिला आहे, (म्हणजे सजीव रूपात) असा भ्रम आपल्या हृदयात आपोआप तयार होतो. त्यात जणू पुंडलिकाचा भाव दाटून आलेला आहे. याकरता आपण सर्वांनी भक्त पुंडलिकाच्या माऊली स्वरूप भावनेने त्याकडे पाहिले पाहिजे, असे महाकवी माडगूळकर सांगतात. वारकरी संप्रदायातील सर्व भक्तगण जेव्हा आषाढी वारीला जातात तेव्हा ते मंदिरात जाऊन विठोबाचे दर्शन घेत नाहीत. कळस कलला की विठोबा पावतो असे म्हणतात. म्हणजे सबंध वारीत 'निर्गुण निराकार विठ्ठल, सगुण साकार होऊन', प्रत्येक माणसात वास करतो. म्हणून आषाढी एकादशीला वारकरी पंढरपूरच्या देवळात गेले नाहीत तरी चालते. कारण 'ठाई ठाई देव आपल्या सोबती' असा भाव सभोवताली नांदत असतो.

म्हणून या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात कवी गदिमा स्पष्ट करतात. अंतरीच्या याच सहवासातून या भगवंताने नामदेव महाराजांची खीर चाकली त्याचप्रमाणे चोखोबांची गुरे राखली. कर्नाटकी संत पुरंदर दासांनी अशा या विराट विठोबाला

परमात्मा मानून त्याची भक्ती केली. संत दामाजी हे बहामनी सुल्तानशाहीत धान्य कोठाराचे प्रमुख होते. त्यांनी भीषण दुष्काळात लोकांच्या मदतीसाठी कोठारातील धान्य दिले. त्यावेळी सुल्तानांना त्याची भरपाई द्यायची होती. अशवेळी श्रीहरी विठ्ठलाने त्यांना मदत केली. अशी गोष्ट सांगितली जाते. म्हणजे विठ्ठल जातीचा भेदभाव न करता भक्तांच्या भेटीला जात असतो. त्यांना सहाय्य करत असतो. म्हणून अभंगाच्या शेवटी ग दी माडगूळकर यांनी परमभक्तांची चार नावे उदाहरणादाखल मांडलेली आहेत.

म्हणजे या अभंग गीतातून महाकवी आपल्याला सांगतात. 'परमेश्वर निर्गुण निराकार आणि सगुण साकार आहे'. त्याचे सर्व भक्तांकडे लक्ष असते. त्यामुळे कोणताही माणूस अधर्माच्या वाटेला जात नाही. म्हणून प्रत्येक माणसाने वारकरी व्हावे.

मग आपल्याला परब्रम्ह पांडुरंग ईश्वर भेटतो, बोलतो, प्रापंचिक अडचणीतून आपल्याला दूर करून, सहज परमार्थ करायला लावतो. तो भक्तांसाठी माऊलीचा अमृत पान्हा आहे. त्यात श्रीविष्णू, शंकर हे आद्य देव विराजमान आहेत. संत नरहरी सोनार हे शिवाला मानणारे व्यवसायिक होते. म्हणून ते विठ्ठलाच्या कमरेचे माप घेताना, आपले डोळे बंद करून गेले तेव्हा त्यांना महादेवाच्या पिंडीचा भास झाला. त्यांनी तेव्हा डोळयावरची पट्टी काढली. त्यावेळी शैव, वैष्णववाद संपुष्टात आला, असे म्हटले जाते. म्हणून विठ्ठल मूर्तीच्या वरच्या बाजूस मस्तकाच्या मधोमध मुकुट काढल्यावर एक महादेवची पिंड आपल्याला दिसते, असे जानकर सांगतात. म्हणजे हा विठ्ठल परब्रह्म आहे हे दिसून येते. हा अध्यात्मिक भावनेचा उच्च विचार कविश्रेष्ठ ग दि माडगूळकर यांनी दाखवून दिला आहे. म्हणून हे गीत फार लोकप्रिय झाले आहे.

# ** सुखमय भक्तीची पायवाट **

॥१७॥




पंढरपूर वारी दर्शन

# 'खेळ मांडीयेला'

खेळ मांडियेला वाळवंटी घाई।
नाचती वैष्णव भाई रे ।।
क्रोध अभिमान गेला पावटणी।
एकएका लागतील पायी रे ||१।।

गोपीचंदन उटी तुळशीच्या माळा।
हार मिरविती गळा।।
टाळ मृदुंग घाई पुष्पवर्षाव।
अनुपम्य सुखसोहळा रे ।।२।।

वर्ण अभिमान विसरली याती।
एकएका लोटांगणी जाती।।
निर्मळ चित्तें जालीं नवनीतें।
पाषाणा पाझर सुटती रे ।।३।।

होतो जयजयकार गर्जत अंबर।
मातले हे वैष्णव वीर रे।।
तुका म्हणे सोपी केली पायवाट।
उतरावया भवसागर रे।।४।।
***

## 'खेळ मांडीयेला' या अभंगाचा भावार्थी संवाद
## या अभंगाचे अभंगकार आहेत संत तुकाराम.

-

'खेळ मांडियेला' हा अभंग केवळ देव भक्तीचा नाही, तर तो सामाजिक ऐक्याचा अभंग आहे असे मला वाटते. त्यावेळच्या संतांनी वारीची वाट तयार करताना सामाजिक एकतेचा विचार मोठ्या प्रमाणात केला होता. कारण विठ्ठल हे दैवत सर्व जाती-जमातींचे होते. त्यामुळे विठ्ठल भक्तीतून देशातील जातीयतेला घालवता येईल, असा युक्तिवाद सर्व संतांचा होता. हे संत विविध काळातले होते. त्यात संत तुकाराम परखड स्वभावाचे चतुरस्र कविवर्य होते. असे म्हटले तरी वावगे ठरू नये. इतकी मोठी प्रतिभा त्यांच्या अंतरंगात रुजलेली होती. म्हणून त्यांनी वरील अभंग लिहिला. तो अभंग आज आपण भावार्थातून पाहू

विठू माऊलीच्या गजरात पंढरीच्या वाळवंटात हरिनाम, हरीकिर्तन, अभंग, भारुड आणि गवळण हे सर्व संत साहित्य प्रकार हरिगणांच्या मुखातून येत आहेत. श्रवण, पठण, भजन या सगळ्या भक्तिमय चैतन्यातून वैष्णव भाई (म्हणजे भाऊ, भावंड) सर्वत्र नाचत आहेत. टाळ मृदुंगाच्या ठेक्यावर मागेपुढे पाय करत आहेत. त्यातून या वाळवंटी हा भक्तीचा खेळ रंगलेला आहे, दंगलेला आहे. अशा या रंगतदार खेळात क्रोध अभिमान गळून पडला आहे. तो अक्षरश: पायदळी उडवला गेला आहे. त्यामुळे सर्व भाविक माऊली म्हणत एकमेकांच्या पाया पडत आहेत. हा सुरेख भाव तुकोबांनी आपल्या पहिल्या कडव्यात आणला आहे.

दुसऱ्या कडव्यात ते म्हणत आहेत. या वैष्णव भक्तानी कपाळाला गोपीचंदनाची उटी लावून गळयात तुळशीची माळ घातली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या गळयात फुलांचा हार आहे. तो हार ते समाधानाने मिरवित आहेत. त्यावेळी टाळ मृदुंगाच्या तालावर 'राम कृष्ण हरीच्या' नृत्यमय खेळात आवघ्या पंढरीत भावभक्तीचा देखणा मळा फुलला आहे. तो फुललेला मळा म्हणजे चंद्रभागेच्या काठावरील पुष्पवर्षाव आहे. असे तुकारामांना या ठिकाणी म्हणायचे आहे. हे असे म्हणण्याचे कारण आषाढ महिन्यात पाऊस धारांचा वर्षाव होत असतो. हा अनुपम्य सुखद सोहळा भाविकांना रम्य वाटत असतो. म्हणून संत तुकोबांनी हा श्रद्धात्मक भाव आपल्या शब्दात मांडला आहे.

या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यात वेदार्थ कवी जगतगुरु तुकाराम म्हतात. या सुखद सोहळयात सर्व वैष्णव यात्री वर्ण, जातीचा अभिमान विसरून गेले आहेत. त्यामुळे सर्व जाती, वर्णाचे लोक एकात्म भावनेने एकमेकांसमोर लोटांगण घालत आहेत. मनातून, चित्तातून हे वैष्णव भक्त नवनीताप्रमाणे (म्हणजे लोण्यासारखे) मऊ झाले आहेत. जणू पाषाणालाही या इथे पाझर सुटावे, असा मानवधर्मी योग इथे निर्मिला आहे. अशी सुंदर भावना यात आली आहे.

शेवटच्या चौथ्या कडव्यात तुकोबा आनंदाने म्हणतात. या पंढरीनगरीत सर्व वैष्णव बांधव पांडुरंगाचा, विठ्ठलाचा, भगवंताचा जयघोष करत आहेत. त्या जयजयकाराने हे अंबर भरून गेले आहे. हे भागवत भक्त भगवंताच्या नामात उत्साही होत चैतन्याने उसळत आहेत. चैतन्याने उसळू पाहणाऱ्या या भावनेला तुकारामांनी 'मातले हे वैष्णव वीर' असे अद्भुत वर्णन केले आहे. मग पुढच्या दोन ओळीत तुकाराम महाराज लिहितात. या भक्तीच्या खेळामुळे भगवंत भेटीची आत्मनंदाची

पायवाट मोकळी झाली आहे. त्यामुळे आता मोह जाळाचा भवसागर पार होणार आहे. 'उतरावया भवसागर रे' याचा अर्थ भवसागर आता उतरत चालला आहे.

अशा प्रकारे जगतगुरु तुकाराम महाराजांनी वारीचे वर्णन केले आहे. आजही त्याप्रमाणे आषाढी वारीचे मार्गक्रमण होते. आजही भाविक त्याच चैतन्याने वारीत सामिल होतात. म्हणूनच 'खेळ मांडियेला वाळवंटी घाई' हा अभंग आजही लोकप्रिय आहे.

# ** सांगाती माझा **

॥१८॥



## आधी – ईश्वर सांगाती (आई)

# 'जेथे जातो तेथे'

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ।
चालविसी हाती धरूनिया ।।
चालो वाटे आम्ही तुझाचि आधार ।
चालीविसी भार सवे माझा ।।
बोलो जाता बरळ करिसी ते नीट ।
नेली लाज धीट केली देवा ।।
अवघे जन मज झाले लोकपाळ ।
सोइरे सकळ प्राणसखे ।।
तुका म्हणे आता खेळतो कौतुके ।
झाले तुझे सुख अंतर्बाही ।।
***

## 'जेथे जातो तेथे' या गीताचा भावार्थी संवाद
## या अभंगाचे अभंगकार आहेत संत तुकाराम.

मित्रांनो ज्ञानेश्वर माऊलींनी सांगून ठेवले आहे. प्रत्येक जीवात एकच परमात्मा आहे. त्यामुळे प्रत्येक जनात, प्रत्येक मनात तो परमेश्वर वसलेला आहे. आपण सर्वजण त्याच ईश्वराची लेकरे आहोत. ज्ञानेश्वर माऊलींच्या याच विचारला तुकाराम महाराजांनी आपल्या वेगळया शब्दात साकारले आहे परंतु या दोन संतांच्या मनात रुजलेला भाव एक सारखाच आहे. असे मला व्यक्तीशः वाटते. म्हणून आपण हा अभंग आज जाणून घेणार आहोत.

तुकोबा या अभंगाच्या पहिल्या दोन ओळींमध्ये देवाला उद्देशून सांगत आहेत. हे परमपिता परमेश्वरा

'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' आहेस, मित्र आहेस. सतत तू माझ्यासोबत चालत आहेस. माझा हात धरून तूच मला पाहिजे तिकडे घेऊन जात आहेस.

म्हणून सुरुवातीच्या कडव्यातील चार ओळीततुकाराम म्हणत आहेत. देवा पाहिजे तिकडे तू मला घेऊन जातोस.

त्यामुळे मला असे वाटते आहे. तू माझा आधारू आहेस, तुझ्या आशीर्वादाने हे माझे जीवन चालले आहे. कारण तू स्वतः माझा जीवनभार वाहतो आहेस, माझी वाट सोपी करतो आहेस. मी काही बोललो, बरळलो किंवा काही अविचार केला, तरी तू मला नीट सांभाळून घेतो. या तुझ्या कृपेमुळे माझ्या कृतीला अर्थ प्राप्त होतो. तुझी साथ, संगत असल्यामुळे मी माझ्या विचाराची, भाषेची आणि वाणीची लाज बाळगत नाही. मी धीटपणाने आचरण करतो. तू दिलेल्या ज्ञानाचा वापर करतो.

तर शेवटच्या कडव्यातील चार ओळीत तुकाराम महाराज कृतज्ञ होऊन व्यक्त होतात ते आता म्हणतात. हे ईश्वरा मला माझ्या जीवनात कसलीही अडचण जाणवत

नाही. कारण माझ्या सभोवताली कायम लोक सहवास असतो. हे लोक मला आपलं मानतात, माझं पालन, पोषण, रक्षण करतात. त्यांच्यातच मी देवा तुला पुजतो. असे हे भक्तजन माझे सोइरे सकळ प्राणसखे आहेत. म्हणजे जिवाभावाचे नातेवाईक आहेत. या आंतरिक आनंदाचे देवा मला कौतुक वाटते. म्हणून मी तुझ्या वेदशास्त्राचा किर्तन खेळ मांडतो. त्यातून मला अंतर्बाह्य सुख मिळते. याचे मला आंतरिक समाधान आहे.

या अभंगातून तुकारामांना म्हणायचे आहे.

या सृष्टीत परमेश्वराच्या भक्ती शिवाय पान हालत नाही. प्रत्येक श्वासात तो पालन हार नारायण अदृश्य रुपात आपल्या बरोबर असतोच असतो. त्या नारायणाला आपण बाजूला काढू शकत नाही. इतका तो एकात्म आहे, आपला सोबती आहे. त्या परमेश्वराच्या अस्तित्वाने आपल्या जीवनाला खरा आधार मिळतो. आपल्या पाप, पुण्याचा भार तो सांभाळतो. त्याच्या संकेताने जो जीवन जगतो तो पुण्यवान असतो. नाहीतर तो पापी ठरतो. देव कायम पुण्यवान माणसाच्या विचारात असतो. तो त्यांच्या विचारांवर अंकुश ठेवतो. मग तो माणूस आत्मविश्वासाने जगाला सामोरा जातो. या ईश्वरी ज्ञानाच्या जोरावर तो लोकसंग्रहाचे पाठबळ मिळवतो. हे सारे लोक मग त्याचे सख्खे सोबती होतात. ही त्या माणसाची ईश्वरी भक्ती असते. म्हणून तो जनमाणसांना देव समजून ईश्वरी कथा, गाथा सांगतो. त्यातून त्या माणसाला मनस्वी आनंद होतो. मग तो कौतुकाने देवाचे गोडवे गातो. त्यातूनच त्याला अंतर्यामी सुख मिळत जाते. असा हा सुंदर विचार या अभंगात मांडलेला आहे.

हा माझ्या चिंतनाचा एक आरसा आहे. तो आपण जाणून घ्यावा आणि आपणही या अभंगाचे चिंतन करावे.

# ** तुझे नाम घेता, नको वेदगीता **

॥१९॥



देव चरणी लिन व्हावे, मंगल करावे जीवन समाधानी

## 'प्रभु तू दयाळू'

प्रभु तू दयाळू कृपावंत दाता
दया मागतो रे तुझी मी अनंता
जगविण्यास देहा दिली एक रोटी
नमस्कार माझे तुला कोटी कोटी
वासना कशाची नसे अन्य चित्ता
तुझ्या पावलांशी लाभता निवारा
निघे शीण सारा मिळे प्रेमधारा
सर्व नष्ट होती मनांतील खंता
ज्ञान काय ठावे मला पामराला
मनी शुद्ध माझ्या असे भाव भोळा
तुझे नाम ओठी नको वेदगीता
***

# 'प्रभु तू दयाळू' या गाण्याचा भावार्थी संवाद
# या गाण्याचे गीतकार आहेत. कवी उमाकांत काणेकर

मित्रांनो आपल्या बालपणी सार्वजनिक पूजेच्या दरम्यान काही भक्तीगीते हमखास आपल्याला ऐकायला मिळायची. त्यामध्ये 'प्रभू तू दयाळू' हे गाणे कायम लागायचे. ते गाणे खास कुठल्याही देवावर आधारित नव्हते परंतु माणसाने परमेश्वर भक्तीची साधना का करावी. हे सर्व या गाण्यात यथार्थ भावनेने सांगितले आहे. म्हणून ते गाणे माझ्या अंतरंगात कायम वसलेले आहे. आज आपण त्याच गाण्याचा आस्वाद घेणार आहोत.

या गाण्याच्या पहिल्या दोन ओळीत. कवी उमाकांत काणेकर सहज म्हणतात. देवा तू दयावंत आहेस, कृपाळू आहेस, सुख देणारा दाता आहेस. तू सर्व विश्वात व्यापून राहिलेला आहेस. म्हणून हे अनंता मी तुझ्याजवळ दया मागतो आहे. तुझी दया कायम माझ्या शिरावर असू दे. असा अंतरिक अर्थ या दोन ओळींचा आहे.

पुढच्या कडव्यातील पहिल्या अंतऱ्यात कवी सांगत आहेत. तुझ्या दयेमुळे, कृपेमुळे जगण्यासाठी, पोटासाठी जे काही आवश्यक आहे ते सर्व काही तू मला दिलं आहेस. म्हणून मी क्षणोक्षणी तुझे आभार मानतो. तुजला कोटी कोटी नमन करतो. तुझ्या प्रति असलेल्या या भावनेतून माझ्या मन, चित्तात अन्य कोणतीही वासना शिल्लक राहिलेली नाही. असा भाव या इथे प्रगट होतो.

दुसऱ्या अंतऱ्यात कवी स्पष्ट करतात. देवा तुझ्या निरंतर भक्तीने तू माझ्यासोबत पदोपदी येत असतोस. त्यामुळे प्रत्येक कठीण परिस्थितीत तू मला दिशा दाखवतोस. म्हणजे जीवनाच्या ऊन, वारा, पावसात तू निवारा म्हणून सोबत करतो. या सर्व श्रमातून मला येणारा शीण, थकवा कुठल्या कुठे निघून जातो. कारण मी तुझ्या

प्रेमधारेत नाहून निघतो. यातून आपल्याला जाणून घेता येते. भक्ताचा शाश्वत आधार फक्त आणि फक्त परमेश्वर आहे.

आता तिसऱ्या व शेवटच्या अंतऱ्यातून कविवर्य आपल्याला संदेश देतात. देवा मला आध्यात्मिक ज्ञान वगैरे काही ठाऊक नाही. मला पामराला तुझा सत्संग मिळाला, एवढच पुरेस आहे. कारण माझ्या मनात तुझ्या भावभक्तीचा भोळा शुद्ध भाव आहे. त्यामुळे मला खूप काही मिळालं आहे. आता इच्छा एकच आहे. माझ्या ओठावर तुझं नाम असावं. तीच माझ्यासाठी भगवतगीता आहे.

हा देवा विषयीचा श्रद्धाभाव काव्यात मांडताना उमाकांत काणेकर यांनी किती सुंदर मोजके शब्द योजलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक माणसाला या शब्दांची गोडी अंतर्मनातून चाखता येते. त्यातून एक अमृत अनुभव प्रत्येकाला घेता येतो. हे या गीताचे सामर्थ्य आहे. ते सामर्थ्य उत्कट अशा स्वर, संगीताने प्रप्त झाले आहे. अशा या प्रभावी गीताचे संगीतकार आहेत. श्रीकांत ठाकरे ते बाळासाहेब ठाकरे यांचे भाऊ आणि राज ठाकरे यांचे वडील आहेत. या स्वर्गीय गीताला स्वरबद्ध केले आहे. गायक महंमद रफी यांनी. हा भावार्थ मी माझ्या संत साहित्याच्या अभ्यासातून मांडला आहे. तो आपल्याला नक्कीआवडेल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

# ** जीवनाचे गाणे कसे गावे **

॥२०॥



जीवनाच्या वेदनेतही, आनंद सुखाचे गीत गावे

# 'माझे जीवन गाणे'

माझे जीवन गाणे,
माझे जीवन गाणे !

व्यथा असो आनंद असू दे.
प्रकाश किंवा तिमिर असू दे
वाट दिसो अथवा न दिसू दे, गात पुढे मज जाणे

कधी ऐकतो गीत झऱ्यातुन
वंशवनाच्या कधी मनातुन
कधि वाऱ्यातुन, कधि ताऱ्यांतुन झुळझुळतात तराणे

गा विहगांनो माझ्यासंगे
सुरांवरी हा जीव तरंगे
तुमच्यापरी माझ्याहि सुरांतुन उसळे प्रेम दिवाणे

***

## 'माझे जीवन गाणे' या गाण्याचा भावार्थी संवाद या भावगीचे गीतकार आहेत. कवी मंगेश पाडगांवकर

मित्रांनो आपण या भूलोकी जीवन जगण्यासाठी आलो आहोत. त्यामुळे आपल्याला ज्या प्रकारचे जीवन लाभले आहे. त्या जीवनात आपण समाधानाने आपली प्रगती साधायला हवी. म्हणजे आपण आपले जीवन गाणे चांगल्या सुरावटीने गायला हवे. म्हणून कायम आपण प्रसन्न चित्ताने आयुष्याची वाटचाल करायला हवी. कविवर्य मंगेश पाडगागांवकर या गाण्यातून आपल्याला हेच सांगण्याचा प्रयत्न करतात.

मंगेश पाडगांवकर या गाण्याच्या पहिल्या अंतऱ्यात सांगत आहेत. आपल्या जीवनात सुख आहे की दुःख, तेजस्वी प्रकाश आहे की अंधार दाटलेला आहे. वाट दिसते आहे की दिसत नाही. याचा जास्त विचार न करता. माणसाने आपले गाणे गात पुढे गेले पाहिजे. याचा अर्थ जीवनाच्या प्रचंड वेदनेतही माणसाने चालायला हवे. हा आशावाद कविवर्यांच्या यथार्थ शब्दात आलेला आहे.

मधल्या अंतऱ्यात कवी पाडगांवकर म्हणतात. माणसाच्या डोळयासमोर आणि पायाखाली कितीही वेडीवाकडी खडतर पायवाट असली किंवा माणसाच्या आयुष्यात संकटांचे कितीही वंशव्यापी घनदाट अरण्य असले, तरी आपल्याला यशस्वी जीवनाचा मार्ग धरायला हवा. त्यासाठी आपण कायम सक्षम राहायला हवे. मग पुढे अगदी झोंबणारा थंडगार वेगवान वादळी वारा असू दे. नाहीतर पौर्णिमेची सुंदर अशी चांदणी रात्र असू दे. काही असले तरी आपल्याला हे झुळझुळणारे तराणे गोड वाटले पाहिजेत. म्हणजे आपल्याला कष्टप्रत जीवनातही शांती समाधानाचा राजमार्ग शोधता आला पाहिजे.

शेवटच्या अंतऱ्यात मंगेश पाडगांवकर कृतार्थ होऊन जीवनाचा सार सांगत आहेत. गा पक्षांनो तुम्ही (विहगांनो) माझ्यासोबत हे छान, सुंदर, अप्रतिम जीवन गाणे, पण ते गाताना असे गा की त्या सुरांवर जीव तरंगला पाहिजे. म्हणजे आनंदाने आपले मन डुलायला हवे. त्यातून जीवनाबद्दलचे प्रेम मनात उसळायला हवे आणि या सर्वातून नवजीवनाचे मंथन घडून आले पाहिजे. अशाप्रकारे जीवनाचा सकारात्मक दृष्टिकोन कवी पाडगांवकर यांनी इथे मोजक्या शब्दात लिहून ठेवला आहे.

या संपूर्ण गाण्याचा अर्क आपल्याला काढायचा झाला, तर आपल्याला एकच म्हणावे लागेल. परमेश्वराने आपल्याला जे सुंदर जीवन दिले आहे ते आपल्याला अधिक सुंदर करायचे आहे. असे हे जीवन सुंदर करत असताना, माणसाने नेहमी सकाराने विचार करावा. त्यामुळे आपले जीवन सफल होऊ शकते. म्हणून हे गीत गेली अनेक वर्षे प्रत्येक मराठी मनावर अधिराज्य करित आहे. कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी अशा प्रकारची विविध रुपी जीवनगाणी लिहून ठेवली आहेत. ती गाणी आजही रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून जातात. त्या सर्व गाण्यांमधले हे बहारदार गाणे आहे, असे मला नेहमी वाटते. गंगा, यमुना, सरस्वती या नद्यांच्या संगमाला आपण पावन मानतो. त्याचप्रमाणे या संगीत रचनेत कवी, गीतकार मंगेश पाडगांवकर यांच्यासोबत संगीतकार पु. ल. देशपांडे आणि पंडित जितेंद्र अभिषेकी हे अलौकिक कलावंत आहेत. म्हणून ही गीतरचना संगीत कला संगम घडवणारी सुंदर स्मरणी आहे. हा काव्य भावार्थ आपल्याला नक्की आवडेल. माझ्या विचारातून जे अर्थवाही शब्द उमटले, ते मी या लेखात मांडले आहेत. त्यामुळे आपण या गाण्याचा आणखी चांगला विचार करावा, असे मला सांगायचे आहे.

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या. साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धीआणि विकास नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820 (Whatsapp free books)